POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३३७ ● मुंबई, मंगळवार, ०८ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

समुद्रात दिसलं असं काही ६०० पोलिसांनी जिल्हा पिंजून काढला

चौकशीतून नेमकं काय समोर आलं?

या तपासानंतर रायगडच्या पोलिसांनीही मोठी आणि महत्वाची माहिती दिली आहे. रेवदंडा समुद्रकिनाऱ्यात जे आढळलं होतं तो बोटीचा केवळ एक छोटा भाग होता. सबंधित बोट ही पाकिस्तानच्या कराचीमध्येच आहे. मासेमारी बोटीचा बोया असल्याने त्याला जीपीएस ट्रॅकर आहे. या ट्रॅकरमुळेच भारतीय नौदलाने बोटीची ओळख पटवली आहे. मात्र मूळ बोट पाकिस्तानात असून बोटीचा काही अवशेष भारतात वाहून आल्याचं निष्पन्न झालं आहे. खबरदारी म्हणून पोलिसानी रायगड जिल्हा पिंजून काढला मात्र काळजी करण्यासारखे कारण नाही, रायगडच्या पोलिसांनी सांगितले आहे.

■मुंबई। प्रतिनिधी:

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम या भागात झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध कमालीचे ताणलेले आहेत. भारताने पाकिस्तानसोबतचे सर्व व्यवहार, व्यापार बंद केलेला आहे. तसेच पाकिस्तानी जहाजांना भारतीय बंदरांत येण्यास मनाई केली आहे. असे असतानाच रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथील समुद्रकिर्नायावर संशयास्पद प्रकार समोर आला आहे. येथे रात्रीच्या अंधारात संशयास्पद बोट आढळली (बोटीचा काही भाग) आणि ती पुन्हा गायब झाली आहे. दरम्यान, आता याच बोटीबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या माहितीनंतर सर्वच यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत.

हा प्रकार समोर आल्यानंतर रायगड पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तपासणी केली. त्यांनाही संबंधित संशयित बोट दिसलेली नाही. बोट खोल समुद्रात असल्याची माहिती मिळाली होती.आज सकाळी पासून पुन्हा या बोटीला शोधण्याचं काम सुरू होतं. हेलिकॉप्टरच्या मदतीनेदेखील या बोटीचा शोध घेण्यात आला.

नेमका प्रकार काय?

मिळालेल्या माहितीनुसार रायगडच्या अलिबाग रेवदंडाजवळ असलेल्या कोर्लई किल्ला येथे रडारवर नौदलाला एक बोट (बोटीचा काही भाग) दिसली रायगडच्या समुद्रकिनाऱ्यावर अचानक अनोळखी जहाज असल्याचे समजले होते. ही माहितीरात्रीपासून कोस्टगार्डलाही मिळाली होती. मात्र ही बोट सोमवारी (७ जुलै) सकाळपासून शोधण्यात येत आहे. पण ती आता रडारवर दिसत नाहीये.

आता तपास केल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार नौदलाच्या रडारवर दिसलेली ती बोट पाकिस्तानमधील होती. मुकद्दर बोया ९९ असे या मासेमारीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाकिस्तानी बोटीचे नाव आहे. ही बोट वादळामुळे पाकिस्तानच्या समुद्रकिनाऱ्याहून भारतीय हद्दीत आली होती, असा नौदलाला संशय आहे. संशयित बोट आढळताच संपूर्ण रायगड जिल्ह्यात सर्च ऑपरेशन करण्यात आले आहे.

होटल, लॉज, रिसॉर्ट आणि इतर ठिकाणीही यंत्रणांनी झाडाझडती घेतली आहे. तर मासेमारीसाठी वापरण्यात येणाऱ्या जाळीचा बोया आणि त्याच्यासोबत ट्रांसपोंडर्स वाऱ्यामुळे वाहून आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. ही बोट भारतीय हद्दीत दिसताच यंत्रणा सतर्क झाल्या होत्या. ५२ अधिकारी आणि ६०० पोलिसांनी संपूर्ण रायगड जिल्हा पिंजून काढला आहे.

महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आठवा जरा : ॲडव्होकॅट प्रमोद सामंत

■मुंबई। प्रतिनिधी:

पुढच्या पिढीला जर उतेजन दयायची असेल तर त्यांना महाराष्ट्राची थोरवी कळली पाहिजे. महाराष्ट्राची जडण घडण कळली पाहिजे. तापी नदीच्या खोऱ्यात पूर्वी मानवाचा सांगाडा सापडला. साधरणतः नऊ हजार वर्षांपूर्वी परशुरामाच्या काळातील हा इतिहास आहे. परशुरामांनी हि धर्ती निक्षत्रीय केली आणि ती एका ब्राह्मणाला दान करून स्वतःचे एक वेगळे राज्य निर्माण केले ते कोकण राज्य तो हा कोकण पट्टा अगदी पालघर पासुन सुरत पर्यंत चिपळूण जवळ लोटे परशुरामाचे मंदिर आहे. त्याला महेंद्रगिरी पर्वत म्हणतात. त्याला खरा महाराष्ट्र म्हणतात. राम जेव्हा रामायणात आपले खरे कर्तृत्व दाखविण्यासाठी १४ वर्षे वनवासाला गेले. पंचवटी या तिर्थ क्षेत्रांची आपण पूजा करतो येथे सीतेचे अपहरण झाले होते. महाराष्ट्रा मध्ये जर आपण बघितले तर विदर्भ वगैरे प्रांताची निर्मिती झाली होती. युद्धा मध्ये युधिष्ठराचा पराभव झाला होता. दमयंती हि विदर्भ राजाची कन्या आणि नल हा जलदुर्गाचा राजा होता. जो पर्यंत आपण हि महाराष्ट्राची थोरवी तरुण पिढीला सांगत नाही तोपर्यंत त्यांना महाराष्ट्राची थोरवी कळणार नाही. आजच्या काळातील जो इतिहास आहे त्याला सम्राट अशोक कालीन इतिहास म्हणतात. सम्राट अशोकच्या काळात बौद्ध धर्माचा प्रसार झाला फक्त महाराष्ट्रालाच राष्ट्र हि उपाधी दिलेली आहे. अगदी सातवाहन युगातील हि कथा आहे. शाली वाहन या राजाने परप्रांतावर आक्रमण करून त्यांचा बिमोड केला. शालिवाहन या राज्याच्या राजधानीचे शहर पैठण संबोधले जाते. मराठी भाषा हि खूप जुनी आहे. ४५० वर्षे शालिवाहन राजाने राज्य केले. तसेच यांची प्रमुख भाषा मराठी होती. मोघलांचा पराभव करून स्वाभिमानाने स्वराज्याची निर्मिती केली असेल तर ते फक्त श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव अभिमानाने घेता येते. छत्रपती संभाजी महाराजा नंतर पेशवे कालीन साम्राज्य सुरु होते. मध्यप्रदेशाची राज्यभाषा १९५६. पर्यंत मराठी होती. त्यानंतर ती हिंदी झाली. मध्यप्रदेशावर होळकर, शिंदे, या मराठी सरदारांनी राज्य केले. झाशीच्या राणीचे बालपण पुण्यात गेले आणि त्यांनी राज्य झाशीवर केले.

मराठयांच्या काळात राष्ट्रभाषा मराठी होती. हिंदीची तर उत्पत्ती सुद्धा झाली नव्हती १८५६ च्या राष्ट्रीय उठावात सुद्धा मराठी भाषेचाच शब्द प्रयोग झाला. हिंदी भाषेचे अस्थित्व सुद्धा नव्हते. महाराष्ट्रात मराठी भाषेलाच महत्व दिले पाहिजे. मराठी हि अभिजात दर्जाची भाषा आहे. ७५० वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेतुन ज्ञानेश्वरी लिहिली. मराठी भाषिकांचा इतिहास वारंवार लोकांना समजावून सांगितलं पाहिजे. कार्ले आणि भाजे लेणी (एकविरा देवी) ह्या लेणी कोरताना आर्थिक साहाय्य सोपारा येथील मराठी भाषिकांनी केली. भारतीय संघराज्याला राष्ट्रभाषा नाही. भारताची राष्ट्रभाषा म्हणून मराठीला जागतिक दर्जाचा मान मिळू शकतो म्हणून महाराष्ट्रामध्ये राहणाऱ्या सर्व जण समुदायाने मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविले पाहिजे.

मी तुला विकत घेऊ शकतो... अर्धनग्न अवस्थेत तरुणाची राजश्री मोरेला शिवीगाळ

■मुंबई। प्रतिनिधी:

राज्यात मराठी विरुद्ध परप्रांतीय किंवा मराठी विरुद्ध हिंदी भाषेचा विषय तापला असताना मुंबईत मराठी विरुद्ध मराठी अशीच घटना घडली असून एका मराठी महिलेसोबत मनसेच्या नेत्याच्या मुलाने हुल्लडबाजी केल्याचा प्रकार समोर आला आहे. मनसे प्रदेश उपाध्यक्ष जावेद शेख यांच्या मुलाने रस्त्यावर दारु पिऊन अर्धनग्न अवस्थेत धिंगाणा केल्याचा प्रकार रात्री उशिरा घडला. विशेष म्हणजे राहिल शेखने मुंबईतील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर राजश्री मोरेच्या गाडीला धडक देत तिच्याशी हुज्जत घातली. तसेच, मॉडेल राजश्री मोरेला शिवीगाळ करत पैशाचा आणि आपले वडिल मनसेचे नेते असल्याचा माजही दाखवला होता. मुंबईतील अंधेरी पश्चिम परिसरात मध्य रात्री १ वाजता ही घटना घडली असून सोशल मीडियावर व्हिडिओ तुफान व्हायरल झाला. त्यानंतर, मनसेच्यावतीने पत्रक काढून संबंधित मुलाचा मनसे पक्षाशी काहीही संबंध नसल्याचे पत्रकात म्हटले आहे.

मनसे नेत्याच्या मुलाचा अर्धनग्न अवस्थेत दारूचे नशेत महिले सोबत धिंगाणा करणारा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी राहिल शेखविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते जावेद शेख यांचा मुलगा राहिल जावेद यांने दारुच्या नशेत राजश्रीसह पोलिसांना देखील दम दिला होता. त्यानंतर, पोलिसांनी त्याला आंबोली पोलीस स्टेशनमध्ये नेले असता, पोलीस ठाण्यातही त्याने रात्रभर धिंगाणा केल्याची माहिती समोर आली आहे.

तो मुलगा उद्धटपणे बोलत होता, सातत्याने माझा बाप कोण आहे हे तुला माहिती नाही. तू ठाण्यात जा, माझा बाप मनसेचा जिल्हा उपाध्यक्ष आहे. तू राज ठाकरेंच्या घरी जा, तुझ्या गाडीचा खर्च तिथून घे.. असे तो दारुच्या नशेतील मुलगा माझ्याशी बोलत होता. मी तुला विकत घेऊ शकतो, तुझ्याकडे नसेल तेवढा पैसा मी तुला देऊ शकतो, असे म्हणत तो आरोपी घाण-घाण शिवीगाळ करत होता, असेही राजश्री मोरेने म्हटले. दरम्यान, राजश्री मोरे यांनी उत्तर भारतीयांच्या समर्थनात व्हिडिओ ट्विट केल्यामुळे मनसेकडून राजश्री मोरेला धमकी देण्यात आल्याचा आरोपही तिने केला होता. तसेच, गेल्या काही दिवसांपासून आपल्याला जाणीपूर्वक त्रास दिला जात असून त्यातूनच हा प्रकार घडल्याचा संशय देखील तिने व्यक्त केला आहे.

मुली पळाल्या का? नक्की घडलं काय?

छत्रपती संभाजीनगरच्या विद्यादीप बालसुधारगृहामधून गेल्या आठवड्यात नऊ मुलींनी पळ काढला होता. त्यानंतर पोलिसांनी मुलींना पकडून पुन्हा बालसुधारगृहाच्या ताब्यात दिले. यापैकी काही मुलींनी पालकांच्या ताब्यात देण्यात आलं आहे. पुढे या प्रकरणात चौकशी सुरू झाली आहे. मात्र, या मुली बालसुधारगृहातून नेमक्या का पळाल्या? नेमकं काय घडले? हे शोधण्याचा प्रयत्न केल्यावर धक्कादायक माहिती पुढं आली आहे. या मुलींनी पळ काढल्यानंतर हर्षु ठाकूर या सामाजिक कार्यकत्या भेटल्या. पुढं चौकशी दरम्यानही ठाकूर उपस्थित होत्या. त्यांनी मुलीच्या तोंडून ऐकलेली धक्कादायक माहिती दिली आहे.

प्रेग्नन्सी टेस्ट, क्रॉस लावून उपचार, कॅमेरासमोरच कपडे बदलणे, लेस्बियन अन्...

■बीड। प्रतिनिधी :

लहान वयात गुन्हेगारीच्या वाटेवर भरकटलेल्यांना आयुष्यात पुन्हा एक संधी देण्याचं ठिकाण म्हणजे बालसुधारगृह! गंभीर आरोपांअंतर्गत अटक करण्यात आलेल्या अल्पवयीन मुला-मुलींना बालसुधारगृहांमध्ये ठेवलं जातं. इथे त्यांना गुन्हेगारी पार्श्वभूमीतून बाहेर येण्यास मदत करणं अपेक्षित असतं. मात्र या बालसुधारगृहातील खरी परिस्थिती वेगळीच असल्याचं नुकतं एका प्रकरणामधून समोर आलं आहे. हा सारा प्रकार घडला आहे तो छत्रपती संभाजीनगरच्या विद्यादीप बालसुधारगृहामध्ये!

काहीही झालं तरी प्रेग्नन्सी टेस्ट

बालगृहातील मुलींचे कुठल्याही कारणाने पोट दुखले तरी त्यांची प्रेग्नन्सी टेस्ट केली जात होती असा आरोप मुलींनी केला आहे. मुली आजारी पडल्यावर त्यावर उपचार म्हणून एकाच प्रकारची कुठली तरी गोळी दिली जात होती. त्यामुळे मुली अनेक दिवस एकाच आजाराने ग्रासलेल्या राहायच्या. या गोळीनेदेखील मुली बऱ्या झाल्या नाही तर पवित्र पाणी शिंपडून अथवा शरीरावर क्रॉस चिन्ह काढून त्यांना आता तुम्ही बऱ्या व्हाल असा सांगितलं जायचं, असा आरोप ठाकूर यांनी केलाय आहे.

कॅमेरासमोर कपडे बदलावे लागत

या मुलींना मारहाण व्हायची. त्यांच्या झोपण्याच्या रूममध्ये कॅमेरे लावलेले होते. कपडे बदलताना सुद्धा कॅमेरा समोर त्यांना उभं राहावे लागत असल्याचे मुलींनी सांगितलं असल्याचा दावा ठाकूर यांनी केला आहे. बालगृहामधून या मुलींना मोबाईलवरुन काही मुलांना कॉलसुद्धा करायला लावायचे, असेही त्यांनी सांगितले. मुलींची जवळीक वाढली तर त्यांना 'लेस्बियन आहे' म्हणत चिडवण्यात येते असा ही आरोप ठाकूर यांनी केलाय.

सामाजिक कार्यकर्तीसमोरच नोंदवला जबाब

मुलींचा बालकल्याण समितीपुढे जेव्हा जबाब घेण्यात आला त्यावेळी आपण तिथे उपस्थितीत होतो आणि आपल्या समोरच मुलींनी आपली आपबीती सांगितली असल्याचा दावा ठाकूर यांनी केला आहे.

महाराष्ट्रात १०० मजूरांच्या खात्यातून १०० कोटींचा घोटाळा

■बीड। प्रतिनिधी :

गेल्या काही दिवसांपासून फसवणुकीचे प्रकार वाढताना दिसत आहे. दुर्गम भागातील नागरिकांच्या बँक खात्यात तीन महिन्यात अकराशे कोटींची उलाढाल झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. धक्कादायक म्हणजे आपल्या खात्यात इतकी रक्कम जमा झालीये, याची माहिती त्यांना माहितीच नव्हती. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

गावात रोज मजुरी करून पोट भरणाऱ्या मजुकांच्या बँकेत खाते उघडून त्यात मार्च ते जून २०२५ या तीन महिन्यात तब्बल १०० कोटींच्या घरात उलाढाल झाली आहे. यवतमाळच्या पांढरकवडा येथील बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये झालेली ही उलाढाल काळा पैसा पांढरा करण्यासाठी झाल्याचा आरोप आहे. चोपण, वाघोली, वसंतनगर, दहेली तांडा या अतिदुर्गम भागातील नागरिकांच्या तक्रारीनंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

नागरिकांच्या तक्रारीनुसार, मयूर चव्हाण याने आधार कार्ड आणि विविध कागदपत्र घेतले होते. त्यानंतर गावातीलच रहिवाशी किरण राठोड याच्या खात्यात एक कोटी १६ लाख रुपये आले. इतके पैसे पाहून रहिवाशीही विचारात पडला. मात्र काहीच वेळात ही रक्कम दुसऱ्या खात्यात वळती झाल्याची माहिती मिळाली. हा प्रकार माजी नगराध्यक्ष संतोष बोरेल यांना समजताच त्यांनी बँकेकडे विचारणा केली. असाच प्रकार शेकडो खात्यांमध्ये झाल्याचा प्रकार समोर आला आहे. पांढरकवडा पोलीसांकडे या प्रकरणी तक्रार दिली मात्र पोलीसही कारवाई करीत नसल्याचा आरोप बोरेल यांनी केला आहे.

'तुझी पत्नी माझ्या घरी आणून सोड...' बीडमध्ये सावकारी जाचाला कंटाळून कापड व्यावसायिकाने संपवलं जीवन



■बीड। प्रतिनिधी :

बीडमधून रविवारी सावकारी जाचाला कंटाळून शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना समोर आलेली असताना पुन्हा एकदा सावकारी जाचाला कंटाळून एका कापड व्यावसायिकाने जीवन संपवल्याची घटना समोर आली आहे.

बीड शहरातील पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत वास्तव्यास असणारे राम फटाले यांनी सात वर्षांपूर्वी सावकाराकडून अडीच लाख रुपये दहा टक्के व्याजाने घेतले होते. याची परतफेड देखील २५ हजार रुपये प्रति महिना प्रमाणे करण्यात आली. मात्र पैसे देऊन देखील सावकारी जाच कमी होत नव्हता. 'तुझ्याकडून वेळेवर पैसे देणे होत नसेल, तर तुझी पत्नी माज्या घरी आणून सोड... ' असे म्हणत सावकाराने कापड व्यावसायिकाचा मानसिक छळ केला. वेळोवेळी होणाऱ्या मानसिक त्रासाला कंटाळून अखेर राम फटाले यांनी चार पानांची सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली.

'वेळेवर पैसे देणे होत नसेल, तर तुझी पत्नी माज्या घरी आणून सोड...' अशी धमकी सावकाराने मयत व्यक्तीला दिली. आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी कापड व्यावसायिकाने गळफास घेतल्याची धक्कादायक घटना घडली.

दरम्यान या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात सावकार डॉ. लक्ष्मण जाधव आणि त्याच्या पत्नीसह एकूण सात जणांवर गुन्हा दाखल असून तिघेजण अटकेत आहेत. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी एक पथक रवाना केले आहे. यातील मुख्य संशयित आरोपी डॉ.लक्ष्मण जाधव हा भाजपाचा पदाधिकारी आहे.

जिल्ह्यात महिनाभरापूर्वीच सावकारी जाचाला कंटाळून दोघांनी आत्महत्या केली होती. ही प्रकरण ताजे असतानाच आता आणखी एकाने आत्महत्या केल्याने सावकारीचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे.

सातारा हादरला... पोलीस तात्काळ धावले

■सातारा। प्रतिनिधी :

सातारा तालुक्यातील शिवथर येथे अज्ञात व्यक्तीने एका विवाहित महिलेचा तिच्या राहत्या घरी गळा चिरुन निघृन खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पूजा प्रथमेश जाधव असे खून झालेल्या विवाहित महिलेचे नाव आहे. दरम्यान, खुनाचे कारण मात्र अस्पष्ट आहे. घटनास्थळी सातारा तालुका पोलीस दाखल झाले आहेत. घरात कोणीही नसताना अज्ञात व्यक्तीने संबंधित महिलेचा गळा चिरून खून करून तो पसार झाला आहे. सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली आहे. या प्रकरणातील आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान, या खुनाच कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. तसेच या घटनेमागे नेमकं कोण आहे? याचा शोध पोलिस घेत आहेत.

कुठं जायचंय? मी सोडतो... नीटची तयारी करणाऱ्या मुलीचा रिक्षाचालकाकडून विनयभंग

■अकोला। प्रतिनिधी :

राज्यभरातून लैंगिक अत्याचाराच्या होणाऱ्या घटना वारंवार समोर येत असताना कायद्याचा, पोलिसांचा धाक उरलाय की नाही? असा प्रश्न उपस्थित होतोय. बीडच्या कोचिंग क्लासमध्ये 'नीट' परीक्षेची तयारी करणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर अकोल्यातून नीटच्या क्लाससाठी जाणाऱ्या १६ वर्षांच्या मुलीला रिक्षाचालकानं कुठे जायचंय?..मी सोडतो म्हणत विनयभंग केल्याची घटना समोर आलीय.

या प्रकरणी आरोपी जाफरखान सुभेदार खान याला अटक करण्यात आली असून त्याच्यावर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आलाय. ४ जुलै रोजी परतवाड्याहून अकोला बसस्टँडवर उतरलेल्या १६ वर्षांच्या मुलीला जवाहरनगरला सोडण्याच्या बहाण्याने विनयभंग केला.

कुठे जायचंय? मी सोडतो म्हणत...

पीडित मुलगी गेल्या वर्षभरापासून अकोल्यात राहून ठएएळ परीक्षेची तयारी करत होती. काही दिवसांपूर्वी ती बस स्थानकावरून जवाहरनगरला जाण्यासाठी ऑटो शोधत होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका ऑटोचालकाने नकार दिल्यानंतर जाफरखान नावाचा ऑटोचालक तिला घेऊन जाण्यास तयार झाला. मात्र, मुख्य मार्ग टाळून त्याने मुख्य पोस्ट ऑफिस रोडवरील एका अनोळखी आणि सुनसान रस्त्याने ऑटो वळवला.

हा मार्ग बघून मुलीला संशय आला आणि तिने विरोध केला. यावेळी आरोपी ऑटोचालकाने तिचा हात जबरदस्तीने पकडला आणि दंडाला चावा घेतला. घाबरलेली मुलगी तात्काळ ऑटोतून खाली उतरून मदतीसाठी आरडाओरड करू लागली. पीडित मुलीच्या तक्रारीवरून विश्रामबाग पोलीस ठाण्यात या प्रकरणी विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नराधम रिक्षाचालकाला पोलिसांनी अटक केली.

७३ वर्षांच्या थेरड्याकडून क्लिनिकमधील रिसेप्शनिस्ट तरुणीचा विनयभंग

सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यामध्ये महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पुण्यात ७३ वर्षीय वृद्धाकडून क्लिनिकमध्ये रिसेप्शनिस्ट तरुणीचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. क्लिनिकमध्ये एकटीला पाहून पप्पी दे म्हणत रिसेप्शनिस्ट तरुणीचा लज्जा उपस्थित केली. या प्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील विश्रामबाग रोड परिसरातील एका खाजगी क्लिनिकमध्ये काम करणाऱ्या २७ वर्षीय रिसेप्शनिस्ट तरुणीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली, या घटनेनंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

नागपूरमध्ये पाणी विक्री करणाऱ्या बाईची का होतेय चर्चा?

सुरुवातीला नैसर्गिक मृत्यू झाल्याचा बनावं दिशाने केला मात्र नंतर पोस्टमॉर्टम अहवालात गळा, नाक आणि तोंड दाबल्यामुळे मृत्यू झाल्याचे उघड झाले. यानंतर पोलिसांनी पत्नी दिशा आणि प्रियकर असिफ अन्सारीला अटक केली आहे, या दोघांची कसून चौकशी सुरु असताना दोघांनी गुन्ह्याची कबूली दिली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

■नागपूर। प्रतिनिधी :

पत्नीने पतीचा खून केल्याच्या अनेक घटना तुम्ही ऐकल्या असतील. अशीच घटना नागपुरातील वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. पती हा अनैतिक संबंधास अडसर ठरत असल्यानं पत्नीने प्रियकराचा मदतीने पतीचा नाक तोंड दाबून आवळून हत्या केल्याचे समोर आले आहे. आसिफ इस्लाम अन्सारी उर्फ राजाबाबू टायरवाला असं प्रियकराचं नाव आहे. तर दिशा रामटेके असं पत्नीचं नाव आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, दिशा रामटेके हिचे मृत चंद्रसेन सोबत तेरा वर्षांपूर्वी लग्न झाले होते. त्यांना दोन मुली आणि एक सहा वर्षांचा मुलगा आहे. काही वर्षांपूर्वी चंद्रसेन याला अर्धांगवायूचा झटका आला होता. तेव्हापासून तो घरीच होता. दिशा रामटेके ही पती घरात असल्यानं घरखर्च भागविण्यासाठी पाण्याचे कॅन भरून विक्रीचा व्यवसाय करत होती. व्यवसाय करत असताना काही महिन्यांपूर्वी तिची आसिफ इस्लाम अन्सारी उर्फ राजाबाबू टायरवाला याच्याशी ओळख झाली. आसिफ अन्सारी हा दुचाकी दुरुस्ती आणि पंचर दुरुस्तीच काम करत होता. हळू-हळू दोघांमधील प्रेम सबंध वाढले. याचा पतीला संशय आल्याने तो तिला वारंवार शिवीगाळ करत होता.

पतीने शिवीगाळ केल्याचा राग आल्याने त्याचा काटा काढण्याचे दिशा आणि प्रियकर आसिफ अन्सारीने ठरवले. दिशाने नाका तोंडावर उशीने ठेवून आणि गळा आवरून चंद्रसेनचा खून केला. चंद्रसेन 4 जुलै रोजी घरी निपचित पडलेला दिसला. त्याला रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

ठाकरे ब्रॅण्डची कसोटी!

महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी सक्ती करण्यावरून उसळलेले मराठी अस्मितेचे वादळ राजकीय रुपात स्थिरावणार का? हे आज ठाकरे बंधूंच्या होत असलेल्या मेळाव्यातून स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या मेळाव्याकडे दोन्ही पक्षांचे नेते, पदाधिकारी वा कार्यकर्त्यांच्याही पलीकडे समस्त मराठीजनांचे लक्ष लागले आहे. खरे तर ५ जुलैच्या मोचार्तून सर्वांनाच हिंदीसक्ती विरोधापेक्षाही मराठी भाषेच्या सन्मानार्थ एकवटणाऱ्या वादळाचा अनुभव घ्यायचा होता. एका अर्थाने मराठी माणसांच्या एकजुटीचे विराट शक्तिप्रदर्शन या निमित्ताने घडणार होते. या वादळात दुधारी ठाकरी वीज एकाच मंचावर कडाडणार होती. म्हणूनच हा मोर्चा सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू झाला होता. आतापर्यंत एकमेकांशी संघर्षाच्या पवित्र्यात असलेले शिवसेना ठाकरे आणि मनसे या दोन पक्षातील नेते, कार्यकर्ते कधी नव्हे ते एकमेकांच्या गळ्यात गळे घालून मोर्चा यशस्वी करण्याच्या तयारीला लागले होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने पाठिंबा जाहीर केल्याने मोचार्ला विरोधकांचे राजकीय पाठबळ मिळाले होते. वातावरणही जबरदस्त तापू लागले होते. अशा वेळी मराठी जनशक्तीच्या वज्रमुठीचा घाव वर्मी लागू नये म्हणून भयभीत झालेले सत्ताधारी ऐनवेळी पाऊल मागे घेतील अशी कुणकुण लागली आणि झालेही तसेच. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला हिंदी सक्तीचे दोन्ही जीआर रद्द केले. जीआर रद्द झाल्याची घोषणा होताच, लगोलग मोर्चाही रद्द झाल्याच्या बातम्या झळकू लागल्या. ज्या विषयावरून आक्रमक मोर्चाचा घाट घातला जातोय तो विषय निकाली काढल्यास टाळक्यावर मराठी वज्रमुठीचा टोला पडणार नाही, असे कदाचित सत्ताधाऱ्यांना वाटत होते. म्हणूनच हिंदी सक्तीचा जीआर रद्द करून मोर्चाची हवा काढल्याच्या बाता सत्ताधारी मारू लागले. परंतु याच दिवशी म्हणजे ५ जुलैला विजयी मेळाव्याच्या माध्यमातून हिंदीची तळी उचलून धरणाऱ्या मराठीद्वेषींना ठणकवायचे असा निर्धार उद्धव आणि राज ठाकरेंनी करताच पुन्हा एकदा मराठी मनामनांत अस्मितेचे स्फुल्लींग चेतले. शिवसेनेच्या स्थापनेपासून महाराष्ट्रात विशेष करून मुंबईत ठाकरे ब्रँडचा वरचष्मा राहिलेला आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर थंड पडलेल्या मराठी हातांना रोजगार देण्याच्या मुद्याला हात घालत हा ब्रँड उभा राहिला. प्रादेशिक, भाषिक, वांशिक, सांस्कृतिक, कधी कधी जातीय वा धार्मिक अस्मितेची पृष्ठभूमी ही प्रादेशिक पक्षांच्या उगमाची कारणे सांगितली जातात. महाराष्ट्रात शिवसेनाही याच अस्मितेच्या खतपाण्यावर जोपासली गेली, हळूहळू वाढली, राज्यभरात फोफावली अन स्थिरावली. परंतु काळाच्या ओघात मराठी अस्मितेकडे कानाडोळा करून हाताचे बोट पकडायला दिलेल्या कडव्या हिंदुत्ववादी भावाने खांद्यावर चढून कधी डोक्यावर बसकण मारली हे शिवसेनेच्या पक्षप्रमुखांना समजलेही नाही. मागच्या दोन ते अडीच दशकात या ना त्या कारणाने ठाकरी ब्रँडला राजकीय पटलावर बरेच दणके खावे लागले आहेत. त्यातला पहिला मोठा दणका हा सक्रिय राजकारण करणारे राज ठाकरे तेव्हाच्या शिवसेनेतून बाहेर पडल्याने बसला होता. तर दुसरा मोठा दणका २०२२ मध्ये शिवसेनेची दोन शकले झाल्यानंतर बसला. एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या मदतीने बंड करून शिवसेना पक्षनाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह बळकावल्यापासून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना ठाकरे गटाला आजही आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागत आहे. नाही म्हटले तरी लोकसभेला ठाकरे गटाला बऱ्यापैकी यश मिळाले असले तरी विधानसभेला महायुतीपुढे ठाकरे गटाची पालापाचोळ्यागत अवस्था झाली. राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेलादेखील २००९ सालच्या विधानसभेतील यशाची पुनरावृत्ती करण्यास जमलेले नाही. कधी परप्रांतीय, कधी भोंगे, तर कधी हिंदुत्त्वाची शाल ओढून राज ठाकरे अधूनमधून महाराष्ट्राच्या राजकारणात लक्षवेधी हरकती करत असले तरी त्यांचा पक्ष सत्तेपासून वंचितच राहिला आहे. मागच्या काही वर्षांत प्रादेशिक पक्षांना तडाखे देत देशभर पसरलेल्या भाजपशी जुळवून घेण्यात दोन्ही भावांना अपयश आलेले आहे. त्यामुळे राजकीय अपरिहार्यता म्हणून का होईना दोन्ही बंधूंचे सूर यावेळी जुळताना दिसून येत आहेत. आधी बाळासाहेब ठाकरेंच्या हयातीत आणि त्यानंतर किमान त्यांच्या स्मृती जपण्यासाठी का होईना ठाकरे बंधूंनी एकत्र यावे म्हणून उद्धव व राज यांच्यावर निष्ठा ठेवलेले नेते, कार्यकर्ते याच क्षणाची मागच्या दोन दशकांपासून आतुरतेने वाट बघत होते. आधी हिंदी मग हिंदुत्व आणि आता हिंदीवर घसरलेल्या सत्ताधाऱ्यांनी हिंदी सक्तीचा जीआर मागे घेतला. पण, यातून हळूच टाकलेली हिंदी विरुद्ध मराठी भाषिक वादाची ठिणगी हळूहळू पेटताना दिसतेय. हिंदीतून बोलण्याचा हट्ट धरणाऱ्या मिरारोडच्या व्यापाऱ्याला मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी थोबडले. ही पहिलीच घटना नसली, तरी यावरून महामुंबईतील वातावरण मात्र तापू लागले आहे. लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यातही मुंबई महापालिका आपल्या ताब्यात घेण्यासाठी भाजपसह शिंदे गटही प्रयत्नशील आहे. ठाकरेंचे अल्पमतातले मराठी विरुद्ध भाजपचे बहुमतातले परप्रांतीय हिंदी अशी ही सरळ लढत होण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदेंनी जय गुजरात म्हणत या लढतीचा शंख फुंकलाय. त्यावर दोन्ही ठाकरे बंधूंकडून आजच्या मेळाव्यात सणसणीत ठाकरी उत्तर अपेक्षित आहे.

महाराष्ट्राच्या छातीत गुजराती खंजीर!

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी हुतात्म्यांच्या बलिदानाने महाराष्ट्राची स्थापना झाली. मात्र आजच्या नेत्यांनी 'जय गुजरात' घोषणेद्वारे महाराष्ट्राच्या अस्मितेला धोका निर्माण केला आहे. सत्तेसाठी इतिहास, संस्कृती व स्वाभिमानाचा अपमान होत आहे, ही चिंतेची बाब आहे.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर भाषावार प्रांतरचना झाली. मराठी भाषिकांच्या महाराष्ट्रासाठी 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' उभी राहिली. मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र मिळवण्यासाठी १९५६ ते १९६० या काळात प्रचंड आंदोलन झाले. १०६ हुतात्म्यांच्या बलिदानाने १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राचा मंगलकलश आणला. त्या क्षणापासून 'जय महाराष्ट्र' या घोषणेचा गजर अखंडपणे सुरू आहे. ही केवळ घोषणा नाही, ती मातृभूमीच्या अभिमानाची आणि हुतात्म्यांच्या स्मरणाची प्रेरणा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, मराठी माणसाच्या अस्मितेची आणि स्वाभिमानाच्या संघर्षाची साक्ष आहे. 'जय महाराष्ट्र' म्हणणं म्हणजे महाराष्ट्राची संस्कृती, संघर्ष आणि स्वाभिमानाला नमन करणं होय. पण आज महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री महाराष्ट्राच्या पावनभूमीवर 'जय गुजरात'च्या घोषणा देत असतील तर ते स्वाभिमानी महाराष्ट्राच्या छातीत गुजरातचा खंजीर खुपसत आहेत, असेच म्हणावे लागेल.

छत्रपतींच्या महाराष्ट्रात ह्यजय गुजरातह्न?

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राच्या या मातीला, मराठी माणसाला स्वाभिमानाचा साज चढवला. त्यांच्या शिकवणीवर चालणारा महाराष्ट्र कधीही परकीय आक्रमणासमोर झुकला नाही. हा महाराष्ट्राचा जाज्वल्य इतिहास आहे. भाषावार प्रांतरचना होत असताना मुंबईला केंद्रशासित प्रदेश बनवण्याचा मोरारजी देसाई यांचा डाव याच महाराष्ट्राने हाणून पाडला. मुंबई आणि महाराष्ट्र एक असतील, हे ठामपणे सांगणारा हा भूभाग आजही 'जय गुजरात' म्हणणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या गुलामीला स्वीकारणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय सत्तेला धडा शिकवण्यासाठी आणि लुटून गेलेली संपत्ती पुन्हा मिळवण्यासाठी सुरतेवर स्वारी केली होती. सत्ताधीशांचे अभय मिळवण्यासाठी त्याच सुरतेत जाऊन बसलेल्या लोकांना इतिहासाचे विस्मरण झाले आहे. 'जय गुजरात' म्हणणं हे शिवरायांच्या परंपरेशी बेईमानी करणं आहे. सत्तेच्या स्वार्थापोटी इतिहासाची उलथापालथ करून महाराष्ट्राच्या अस्मितेची बोली लावण्याचे पाप आहे.

यशवंतराव चव्हाणांचा महाराष्ट्र आणि शिंदेंचा मार्ग

पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचा स्वतंत्र विचार, स्वाभिमान आणि विकासाचा मार्ग आखला. त्यांच्या काळापासून महाराष्ट्र हे राज्य राजकीय, औद्योगिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अग्रणी राज्य म्हणून ओळखले जाते. ते दिल्लीच्या राजकारणात केंद्रीय मंत्रिमंडळात गेले, तरी त्यांच्या कृतीतून महाराष्ट्राची मान आणि शान कुठेही झुकवली नाही. उलट हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला, अशी प्रशंसा झाली. त्यांच्या देशपातळीवरील कार्यानें महाराष्ट्राची मान उंचावली. यशवंतराव चव्हाण ज्या सातारा जिल्ह्याचे सुपुत्र होते, शिंदेही त्याच सातारा जिल्ह्यातले; पण शिंदेंना कृष्णेच्या पाण्यापेक्षा नर्मदेच्या पाण्याची 'चव' आवडते, हे सह्याद्रीचे दुर्दैव.

गुजराती उपकारांपुढे झुकलेले

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहरातील एका सार्वजनिक कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत 'तुमच्या समोर आमचे शीर झुकते' असे म्हणत 'जय गुजरात' अशी घोषणा केली. ही फक्त घोषणा नसून, एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पक्षाच्या विचारधारेची आणि मोदी-शहा या गुजराती नेत्यांच्या प्रति त्यांच्या मनात असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे. शिंदेंना शिवसेना फोडण्यासाठी ज्यांनी बळ दिलं, बेईमानीचे बक्षीस म्हणून ज्यांनी शिंदेंना मुख्यमंत्रीपद दिलं, त्या नेत्यांना खुश करण्यासाठी जे काही करता येईल ते सर्व शिंदे करत आहेत. ते या नेत्यांच्या उपकाराच्या ओज्याखाली इतके दबले आहेत की या उपकाराची परतफेड करण्यासाठी महाराष्ट्राचा बळी द्यायलाही ते अजिबात मागे-पुढे पाहणार नाहीत, हे त्यांनी अनेकदा दाखवून दिले आहे.

शिंदेंच्या कार्यकाळात महाराष्ट्राची अधोगती

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या कार्यकाळात वेदांता-फॉक्सकॉन, टाटा-एअरबस यासारखे मोठे प्रकल्प गुजरातला गेले. हे प्रकल्प महाराष्ट्रातच होणार होते, स्थानिक पातळीवर त्यासाठी जमीन आणि धोरण तयार होते, पण दिल्लीश्वरांच्या आदेशाने हे प्रकल्प गुजरातकडे वळवले गेले. त्यावेळी मोदीजी महाराष्ट्राला यापेक्षा मोठा प्रकल्प देतील, असे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले होते. तो मोठा प्रकल्प कुठे अडकला आहे, याकडे महाराष्ट्रातील लाखो बेरोजगार तरुण आणि लघुउद्योग डोळे लावून बसले आहेत. पण याबाबतची माहिती महाराष्ट्राला देण्याऐवजी शिंदे आणि त्यांचे सहकारी ह्यगुजरात पाकिस्तानात आहे का?ह्न असे प्रश्न विचारून राज्यातल्या बेरोजगार तरुणांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करतात.

बाळासाहेबांच्या शिकवणीला हरताळ!

उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना हरताळ फासला, अशी आवई उठवून शिंदेंनी शिवसेना फोडली. आमदारांना घेऊन ते गुजरातमध्ये पळाले. तिथून गुवाहाटीला गेले, मग महाविकास आघाडीचे सरकार पाडले. त्यानंतर भाजपने शिंदेंना मुख्यमंत्रीपदावर बसवले. शिवसेना फोडण्याच्या आरोपावर स्पष्टीकरण देताना शिंदे सातत्याने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेऊन आपण त्यांच्या विचारांवर वाटचाल करतो, असे म्हणतात. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना मराठी माणसांच्या हक्कांसाठी काढली होती. याचाही विसर एकनाथ शिंदेंना पडला आहे. शिंदेंनी फक्त आपल्यावरील बेईमानीचा डाग धुण्यासाठीच बाळासाहेब ठाकरेंच्या नावाचा वापर केला. त्यांची निष्ठा बाळासाहेबांच्या विचारांशी नाही, त्यांना संरक्षण देणाऱ्या केंद्रात सत्तेवर असलेल्या गुजराती सत्ताधाऱ्यांशी आहे, हे महाराष्ट्र गेल्या तीन वर्षांपासून पाहत आहे.

महाराष्ट्रावर वाईट वेळ

महाराष्ट्रातील सत्ताधारी कायम दिल्लीच्या आदेशाकडे आणि हालचालींकडे डोळे आणि कान लावून बसलेले असतात. स्वयंकर्तृत्वाने नाही, तर दिल्लीच्या मेहेरबानीने आपल्याला सत्ता आणि पदे मिळाली आहेत, याची कल्पना त्यांना असल्याने महाराष्ट्रातील जनतेच्या प्रश्नांपेक्षा दिल्लीतल्या हालचालींकडे त्यांचे जास्त लक्ष असते. महाराष्ट्रातल्या युवकांना रोजगाराची गरज आहे, शेतकऱ्यांना मदतीची गरज आहे, मराठवाड्याला पाण्याची गरज आहे आणि विदर्भाला गुंतवणुकीची, रोजगार देणाऱ्या उद्योगांची गरज आहे. यासाठी काम करण्याऐवजी दिल्लीच्या आदेशाने बुलेट ट्रेन आणि शक्तिपीठ महामागार्सारखे कोणतीही मागणी आणि आवश्यकता नसलेले प्रकल्प महाराष्ट्रावर लादले जात आहेत. याचा महाराष्ट्राला फायदा होईल की नाही, माहिती नाही, पण नुकसान मात्र नक्की होणार आहे. इथला शेतकरी भूमिहीन होणार आहे. आज समृद्ध असणारा शेतकरी उद्या मजूर होणार आहे. याची सत्ताधाऱ्यांना चिंता नाही, हे भीतीदायक आहे.

देशाला दिशा देणारा महाराष्ट्र

महाराष्ट्र म्हणजे केवळ एक राज्य नाही, तर तो विचारांचा दीपस्तंभ आहे. इथे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा पाया घातला, महात्मा फुले यांनी शिक्षणाचा आणि समतेचा प्रकाश दिला, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधान दिले, राजर्षी शाहू महाराजांनी समतेचा पाया घातला. लोकमान्य टिळकांच्या प्रखर देशभक्तीने स्वातंत्र्यलढ्याला बळ दिलं. महाराष्ट्राने देशाला समता, न्याय, धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता आणि प्रगतीची मूल्ये दिली. कृषीपासून उद्योगांपर्यंत, साहित्यापासून विज्ञानापर्यंत, सांस्कृतिक वारशापासून सामाजिक सुधारणांपर्यंत महाराष्ट्राने नेहमीच भारताला दिशा दाखवली आहे. आजही महाराष्ट्र हा देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासाचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. काही सत्तालोलुप पुढाऱ्यांनी आपल्या राजकीय फायद्यासाठी महाराष्ट्राचे हे मोठेपण कमी करण्याचा प्रयत्न केला, तरी तमाम मराठीजनांना ते जपावे लागणार आहे. जय महाराष्ट्र!

तेच ते, तेच ते...

बेंगळुरूत क्रिकेटमधील विजयाच्या सोहळ्यासाठी लाखो लोक येतात नि भीषण चेंगराचेंगरीत त्यातील अकरा जण प्राण गमावतात... पुण्याजवळ कुंडमळा येथे पर्यटकांचा भार सहन न होऊन, धोकादायक झालेला पूल कोसळतो नि चार पर्यटक जीव गमावतात... ओडिशातील पुरी येथे जगन्नाथ यात्रेदरम्यान चेंगराचेंगरी होते व त्यात चौघांचा मृत्यू होतो... यातील पुरीमधील दुर्घटना परवाच्या रविवारी पहाटे घडलेली. कवी विंदा करंदीकर आज हयात असते तर त्यांनी आपल्या एका विख्यात कवितेत, 'बेंगळुरूपासून पुरीपर्यंत तेच ते तेच ते' असे बदल करून नवी रचना केली असती. खरे तर आपल्याकडील अनेक कार्यक्रमांतील गच्च गर्दी पाहून, तेथे दुर्घटना घडत नाहीत, हेच सुदैव नि आश्चर्य. पुरीमध्ये जगन्नाथ यात्रेदरम्यान गुंडीचा मंदिर येथील गर्दीत पूजेचे साहित्य घेऊन दोन ट्रक शिरले आणि ही दुर्घटना घडली. पुरी असो... बेंगळुरू असो किंवा कुंभमेळा असो, दुर्घटनांच्या कारणांचे छापील शब्द बदलतात; पण त्या सगळ्या कारणांच्या मुळाशी दिसते ती बेशिस्त, बेफिकिरी, गर्दी नियंत्रणातील अपयश, प्रशासनाची असंवेनदशीलता आणि सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे आधीच्या दुर्घटनांतून काहीही न शिकण्याचा निखालस निर्बुद्धपणा. ओडिशासह इतर अनेक राज्यांतील भाविकांसाठी जगन्नाथ यात्रेला फार मोठे महत्त्व आहे. त्यास दरवर्षी भाविकांची अलोट गर्दी होत असते. त्यात समाज माध्यमांमुळे, एकंदरीत सगळ्यांच बाबतींत अनिश्चितता वाढल्याने अशा यात्रांना जाऊन आपल्या पदरात पुण्य पाडून घेऊ इच्छिणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. ही इतकी अलोट गर्दी होत असेल तर त्याचे व्यवस्थापन बिनचूक करणे ही राज्य सरकारची जबाबदारी. त्यात ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांचे सरकार अपयशी ठरले. या दुर्घटनेनंतर माझी यांनी मागितलेली माफी व काही अधिकाऱ्यांच्या बदल्या यामुळे गेलेल्या लोकांचे प्राण परत येणार नाहीत. त्याच वेळी आता ओडिशाच नव्हे, देशभरातील जनतेने आपल्या वर्तनाबाबत फेरविचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

परदेशी विद्यापीठांचे आगमन

सध्या महाराष्ट्रात एक चांगले चित्र दिसत आहे आणि ते म्हणजे शिक्षणावर होत असलेली चर्चा! प्राथमिक शिक्षणामध्ये किती भाषा असाव्यात येथपासून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात परदेशी विद्यापीठांना स्थान द्यावे किंवा कसे, अशा विविध विषयांवर सर्वत्र चर्चा झडत आहेत. या सहस्त्रकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत सारे विश्व अगदी निकट आले आहे. करोनोत्तर काळात तर ही निकटता अधिक महत्त्वाची ठरत आहे. या निकटतेतून निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांचा विचार करता शैक्षणिक क्षेत्रावर अधिक मोठी आणि परिणामकारक कार्य करण्याची जबाबदारी आली आहे. या पार्श्वभूमीवर भारताने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०'ची रचना करून या धोरणाची अंमलबजावणी करण्यास प्रारंभ केला आहे.

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेला अनेक वर्षांपासून काही मूलभूत आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अभ्यासक्रमांचा जुनाटपणा, संशोधन आणि नवोपक्रमाचा अभाव, उद्योगांच्या गरजांशी जुळणारी कौशल्य विकासाची कमतरता आणि जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकतेचा अभाव ही त्यातील काही प्रमुख कारणे आहेत. दरवर्षी लाखो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात जातात, ज्यामुळे देशाबाहेर मोठ्या प्रमाणावर भांडवल आणि प्रतिभावान मनुष्यबळही जाते. या बाबींचा विचार 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'मध्ये केला गेला आहे. या विचारांच्या माध्यमातून शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाची संकल्पना चर्चेत आली. त्यातच परदेशी विद्यापीठांचे भारतात आगमन हे निश्चितच स्वागतार्ह पाऊल आहे. पण यातही काही आव्हाने आणि धोके आहेत.

उच्च शिक्षणाची सद्यस्थिती

भारतात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जरी वाढत असली तरीही विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणासाठी नोंदणी करण्याचे प्रमाण - ग्रॉस एन्रॉलमेंट रेश्यो (जीईईआर) - जेमतेम ३० टक्क्यांच्या आसपास आहे. हे प्रमाण अमेरिका (८८ टक्के) किंवा चीन (५१ टक्के) यांच्या तुलनेत खूपच कमी आहे. महाराष्ट्रात अनेक नामांकित विद्यापीठे, संशोधन संस्था आणि खासगी शिक्षणसंस्था कार्यरत आहेत. परंतु याआधी गतिशील आणि दूरदृष्टी असलेल्या शैक्षणिक नेतृत्वाचा अभाव, शैक्षणिक धोरणातील कमी लवचीकता, अपुऱ्या स्वरूपाच्या पायाभूत सुविधा, राज्य विद्यापीठांना मिळणारे अपुरे आर्थिक पाठबळ, गुणवत्तेतील विषमता, संशोधनातील मयार्दा, जागतिक रँकिंगमधील पिछाडी आणि 'ब्रेन ड्रेन' ही उच्च शिक्षणासमोरील गंभीर आव्हाने आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने ५० टक्के जीईईआरचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठी हजारो नव्या संस्था, दर्जेदार शिक्षक, गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम आणि जागतिक पातळीवरील सहकार्य गरजेचे आहे. यासाठी भारतामध्ये परदेशी विद्यापीठांना प्रवेश देणे आवश्यक आहे आणि परदेशी विद्यापीठांनाही आता भारतामध्ये यायचे आहे.

परदेशी विद्यापीठांना भारतात का यायचे आहे?

पाश्चिमात्य देशांत शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. अमेरिका, यू.के., कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांमध्ये वाढत्या स्थलांतरामुळे तिकडच्या सरकारांनी विद्यार्थी व्हिसा आणि परदेशी विद्यार्थ्यांवरील निर्बंध वाढवले आहेत. शिक्षणाच्या निधीतील कपातीमुळे हे देश आता भारतासारख्या तरुण लोकसंख्या असलेल्या मोठ्या बाजाराकडे आकर्षित होत आहेत. भारतात पाच ते २४ वयोगटातील जनसंख्या ५० कोटींपेक्षा अधिक आहे. वाढता मध्यमवर्ग आणि शैक्षणिक आकांक्षा यामुळे परदेशी विद्यापीठांना भारतात प्रवेश घेणे फायदेशीर ठरत आहे. परदेशी विद्यापीठे भारतात आल्यास त्याचे भारताला



कोणते फायदे होतील? आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक पद्धती, संशोधनसंधी आणि नवोपक्रम घेऊन येणाऱ्या विद्यापीठांमुळे भारतातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील अध्ययन व अध्यापनातील गुणवत्ता वृद्धिंगत होण्याची मोठी शक्यता आहे. स्पर्धा निर्माण होऊन भारतीय विद्यापीठांना आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यास प्रेरणा मिळेल. उद्योग व शिक्षणातील सहकार्य वाढून एआय, फिनटेक, क्रीडा, हवामान बदल अशा नवनव्या क्षेत्रांत संशोधन केंद्रे स्थापन होण्यास हातभार लागू शकतो. याचबरोबर भारतातच परदेशी विद्यापीठांचे शिक्षण उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांची परदेशात जाण्याची गरज कमी होईल.

फायदे कोणते? आव्हाने कोणती?

महाराष्ट्रातील विद्यार्थी सध्या आयआयटी, आयआयएम किंवा खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी स्पर्धा करत असतात. परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस नवी मुंबईसारख्या ठिकाणी आल्यास आंतरराष्ट्रीय पदवीसाठी अधिकचे पैसे खर्च करावे लागणार नाहीत. विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम, क्रेडिट ट्रान्सफर, ड्युअल डिग्रीचे पर्याय अधिक खुले होतील. त्याचबरोबर येणारी काही आव्हानेही असतील. परदेशी विद्यापीठांची फी रचना त्यांच्या मूळ देशासारखी राहिली, तर ती सरासरी भारतीय विद्यार्थ्यांना परवडणार नाही. ही परदेशी विद्यापीठे भारतातील स्थानिक विषयांवर संशोधन करून जागतिक स्तरावरही संशोधन योगदान देऊन योग्य तो समतोल राखतील का? की केवळ पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमावरच भर देतील? मलेशिया, चीनसारख्या देशांतील काही परदेशी कॅम्पस अपयशी ठरले. तसा अनुभव भारतातही येऊ शकतो.

यावर काय करायला हवे, याचे पहिले उत्तर म्हणजे परदेशी विद्यापीठांनी भारतीय विद्यापीठांसोबत संयुक्तपणे कॅम्पस चालवावेत. आयआयटी-मुंबई आणि मोनॅश विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया हे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे भागीदारी आधारित मॉडेल अधिक प्रभावी, परिणामकारक आणि उपयोगी होऊ शकतील. नॅक, एनआयआरएफ या सारख्या संस्थांनी या कॅम्पसची गुणवत्ता सतत तपासावी. तसेच परदेशी विद्यापीठांनी वाजवी शुल्क धोरण राबवून पारदर्शक आणि गरजेनुसार शिष्यवृत्ती असलेली फी रचना करणे अत्यावश्यक आहे. त्यांचे अभ्यासक्रम भारताच्या कौशल्य गरजांशी (जसे की एआय, पर्यावरण, शेती-तंत्रज्ञान) सुसंगत आणि उपयुक्त असावेत. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी परदेशी संस्थांबरोबर सामायिक संशोधन केंद्रांची स्थापना करून संशोधन प्रकल्प हाती घ्यावेत. पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, कोल्हापूर यांसारख्या शहरांमध्येही कॅम्पस सुरू होण्यासाठी प्रोत्साहन देऊन प्रादेशिक समतोल राखायला हवा. त्याचबरोबर राज्य सरकारने राज्य विद्यापीठांना अधिक आर्थिक पाठबळ देऊन दर्जेदार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संपूर्णपणे नियमित भरती करणे आवश्यक आहे.

परदेशी विद्यापीठांच्या प्रवेशाकडे भारतातील संस्थांसाठी एक धोका म्हणून न पाहता, एक संधी म्हणून पाहणे आवश्यक आहे. जागतिक संस्थांसोबत सहकार्यामुळे भारताच्या शिक्षण पद्धतीला उन्नत केले जाऊ शकते. त्यासाठी योग्य नियोजन, स्थानिक गरजा आणि आर्थिक सामाजिक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. ही संधी जर सूज्ञपणे वापरली, तर भारत - विशेषतः महाराष्ट्र - उच्च शिक्षणाच्या जागतिक केंद्राच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकू शकेल. शिक्षण क्षेत्रातील स्पर्धा, गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संधींच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना जागतिक पद्धतींशी परिचित करून आंतरराष्ट्रीय आव्हानांसाठी तयार करणे ही बाब ऐतिहासिक ठरू शकते. मात्र, समावेशकता, पारदर्शकता आणि शाश्वतता ही तत्त्वे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा ही संधी केवळ एका विशिष्ट गटापुरती मर्यादित राहील.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वांत प्रभावी असे साधन आहे. त्यासाठी नवोन्मेष, चिंतनशीलता आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी एक मजबूत शैक्षणिक प्रणाली आवश्यक आहे. त्यामुळे या नव्या वाटचालीत परदेशी विद्यापीठांशी यशस्वी भागीदारी आणि गुणवत्तेवर आधारित शिक्षण हे आपले 'विकसित भारत' घडवण्याचे खरे मोठे योगदान ठरावे.

शस्त्रसज्जतेचे पुढचे पाऊल

संरक्षण दलांसाठी एक लाख कोटी रुपयांच्या शस्त्रखरेदीस देशाच्या संरक्षण खरेदी परिषदेने मान्यता दिल्याने भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी शस्त्रसज्ज होण्याच्या सेनादलांच्या मार्गावरील एक पाऊल पुढे पडले आहे. पाकिस्तानशी नुकत्याच झालेल्या संघर्षानंतर शस्त्रसज्जतेची गरज प्रकर्षाने समोर आली आहे; त्या पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत काही कळीच्या खरेदीप्रस्तावांना मान्यता मिळाली. त्यामध्ये रखडलेल्या काही प्रस्तावांचाही समावेश आहे.

एकीकडे चीन आणि दुसरीकडे पाकिस्तान अशा आघाड्यांवर सज्ज राहण्याचे आव्हान समोर असताना नव्या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याखेरीज पर्याय नाही. त्यामुळेच या शस्त्रखरेदीच्या निर्णयास महत्त्व आहे. परिषदेने दिलेल्या मान्यतेमध्ये, नौदलासाठी बारा सुरुंगविरोधी नौकांचा समावेश आहे. पाण्याखालील सुरुंगांचा शोध घेऊन ते नष्ट करण्याची क्षमता असलेल्या अशा नौकांची मागणी नौदलाकडून पूर्वीपासून करण्यात येत आहे. गेल्या १५ वर्षांत यासाठी तीन वेळा प्रयत्न झाले, दक्षिण कोरियाशीही त्याच्या पुरवठ्याबाबत वाटाघाटी झाल्या; मात्र विविध कारणांनी ही खरेदी मार्गी लागू शकली नव्हती. त्यासोबतच युद्धभूमीवर नादुरुस्त झालेली वाहने किंवा रणगाड्यांच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात येणारी 'रिकव्हरी व्हेइकल', शत्रूची रडार किंवा अन्य प्रणाली निकामी करणारी इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणाली आणि जमिनीवरून मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या खरेदीलाही या निर्णयाने गती मिळणार आहे.

जगात शांतता नांदली पाहिजे आणि संरक्षणावरील खर्च कमीतकमी झाला पाहिजे, हे मूल्य आदर्श असले, तरी सध्याची भू-राजकीय स्थिती पाहता त्याचे पालन व्यावहारिक दृष्ट्या अशक्यप्राय आहे. अमेरिकेसह सर्व महासत्ता जागतिक व्यासपीठांवर शांततेची व्या

राजगिरा सॅलड

साहित्य : १ वाटी राजगिऱ्याच्या लाह्या, १ कप दूध, २ चमचे साय, १ चमचा मध, मोसंबी, केळी, चिक्कू, चेरी, अक्रोड, पिस्ते.

कृती : सगळ्यात आधी दूध गरम करून घ्या. कोमट होईपर्यंत बाजूला ठेवा. फळं सोलून त्याचे बारीक तुकडे करून घ्या. राजगिऱ्याच्या लाह्या फळांसोबत मिसळून घ्या. त्यामध्ये अक्रोड आणि पिस्ते, चेरीजसुद्धा घाला. आता दूध, साय आणि मध छान एकजीव करून घ्या. हे मिश्रण फळं आणि राजगिऱ्याच्या मिश्रणावर ओता. थोडा वेळ फ्रिजमध्ये ठेवून थंडगार खा!



चेहऱ्यावरील फॅट्स कमी करण्यासाठी

च्युइंगम चघळा : च्युइंगम चघळ्याने गालावरील फॅट्स कमी होण्यास मदत मिळते. जेवल्यानंतर काही मिनिटांसाठी च्युइंगम चावण्याची सवय टाकून घ्या. पण हे क्रिया इतकी अधिक नसावी की याने आपला गळा किंवा जबडा दुखायला लागेल.

एक्स आणि ओचा अभ्यास : पूर्णपणे किमान १५ वेळा एक्स आणि ओ या शब्दांचा उच्चारण करावे. जरा मिनिट आराम देऊन ही क्रिया तीनदा करावी. हा सोप्या उपायाने आपला जबडा मजबूत होईल आणि दोन वेगवेगळ्या प्रकारे जबड्याच्या व्यायामदेखील. या उपाय कधीही आणि केव्हाही करत येऊ शकतो.

जबडा उघडा : आपले तोंड गोल आणि विस्तृत करून उघडा आणि काही सेकंदांसाठी अश्याच मुद्रेत राहा. जबड्याला आराम देऊन पुन्हा करा. हा व्यायाम ९ वेळा करावा. वाटल्यास दिवसातून तीन-तीनदा करू शकता. अधिक वेळा केल्यास वेदना जाणवू शकतात.

चीक लिफ्ट करण्यासाठी : आपले गाल आपल्या डोळ्यांकडे उचला. यासाठी तोंडाचे कोपरे वापरा. गाल उचलण्यासाठी डोळे बंददेखील करू शकता. हा व्यायाम आपल्या सोयीप्रमाणे अनेकदा करता येऊ शकतो. पण अती नसावी हे लक्षात असू द्या.

फिश लिप्स : गाल आतल्या बाजूला ओढा. दोन्ही ओठ बाहेरून खेचून मासोळीसारखे ओठ करावे. दहा सेकंदांसाठी ही मुद्रा असू द्यावी. हा व्यायाम दहा वेळा करावा.

ओठ ओढून गाल फुगव : हा व्यायाम करण्यासाठी ओठ ओढून गाल आतल्या बाजूला ओढा. जसे काही चोखताना केले जातात. काही सेकंद स्थिर राहा आणि नंतर जितकं शक्य असेल तेवढे गाल फुगवा. फुगलेले गाल स्थिर असू द्या नंतर पुन्हा आतल्या बाजूला ओढा. दहा वेळा हा व्यायाम करा. दिवसातून तीनदा दहा-दहा वेळा हा व्यायाम केला जाऊ शकतो.

गाल फुगवा : आपलं तोंड बंद करून गाल आणि तोंडात वारं भरा. नंतर एका गाळातील वारं दुसऱ्या गालात घेऊन जा. किमान दहा वेळा वारं एका गाळातून दुसऱ्या गाळात भरत राहा. हा व्यायाम दिवसातून तीन वेळा करा.

हसा : हसल्याने चेहऱ्याच्या व्यायाम होते. दहा सेकंद हसण्याच्या मुद्रेत स्थिर राहा. दहा वेळा ही क्रिया करू शकता. तसेच दिवसभर हास्य स्मित ठेवल्याने चेहऱ्यावरील फॅट्स कमी होतील आणि दिवसभर सकारात्मकता राहील.

गालाची मालीश : सर्व व्यायाम झाल्यानंतर आपल्या बोटांनी सर्क्युलर मोशनमध्ये हळुवार गाल आणि जबड्याची मालीश करा. याने वेदना आणि ताण कमी होईल.

दात पडतात दाढांचे काय?

लहान मुलांच्या दातांचा प्रश्न जेव्हा निर्माण होतो तेव्हा दात, दाढदुखीची तीव्र वेदना मुलांसोबत मोठ्यांसाठीही काहीशी वेदनादायी ठरते. काय उपाय करावेत यावेळी काही सुचत नाही. अनेकदा डॉक्टरी उपायांना मुलं घाबरतात. पालकही काहीसे डगमगतात. यावेळी मग काहीसे घरगुती उपाय डोके वर काढतात, पण मुलांचा त्रास काही कमी होत नाही.

अधिकता वयाच्या सहा-सात वर्षांनंतर मुलांचे दात पडतात, दरम्यान, होणाऱ्या वेदना या काहीशा सहन होण्याजोग्या नसल्या तरी त्या सहन करण्यावाचून पर्याय नसतो. त्याचबरोबर ज्यावेळी दाढ दुखते तेव्हाही तीच स्थिती असते. यावेळी हिरडी सुजणे, वेदना होणे, त्याचा परिणाम मुलांच्या झोपेवर होणे आदी त्रासाला सामोरे जावे लागते. यावेळी एक उपाय म्हणून ती दाढ काढून टाकली, तर त्या वेदनेपासून सुटकारा मिळू शकतो, असा काहींचा समज असतो. मात्र अकाली दाढ काढणे चांगले की वाईट, त्याचे काय परिणाम होतात याची कारणेही पालकांनी समजून घेतली पाहिजेत. बहुतेक वेळा मुलांना जेव्हा दात येतात त्यावेळी मुलांना जुलाब होणे, उलट्या होण्याचाही त्रास होतो. यावेळी या साऱ्याचा संबंध दात येण्याशी जोडला जातो. यावेळी अधिकतम होणारा त्रास हा मुलांना सहन होण्याजोगा नसतो. यावेळी मुलांच्या शरीरातील पाणीही कमी होते. तर काही वेळा मुलांना डॉक्टरी इलाजाशिवाय पर्याय नसतो किंबहुना सलाईनही लावावे लागते.

लहान मुलांच्या दात, दाढदुखीमुळे घरगुती इलाज म्हणून लवंग तेलाचाही वापर केला जातो. मुलांना दूध बॉटल लागत असल्यामुळे वयाच्या सात वर्षांपर्यंतही काही मुलं दूध पिण्यासाठी बॉटलचा वापर करतात. याशिवाय सातत्याने चिप्स, चॉकलेट खात असल्यामुळे याचा परिणाम दात किडण्यावर होतो, दाढा दुखण्यावर, सुजण्यावर होतो. यावेळी पालकांनी सतर्क राहून मुलांच्या दातांची काळजी घेतली पाहिजे. शिवाय मुलांना दोन वेळा ब्रश करण्याची सवय लावणे, कोणताही पदार्थ खाल्ल्यानंतर चूळ भरायला लावणे आदी सवयी लावण्याची गरज आहे. याखेरीज मुलांचे सहा-सहा महिन्यांनी चेकअप करणे आवश्यक आहे. दातांची स्वच्छता, कोणते पदार्थ किती प्रमाणात खावेत, ते खाल्ल्यानंतर चूळ भरावी आदी गोष्टींवर लहानपणापासून मुलांनाही दातांची काळजी घेण्याची सवय लावली, तर ते फायदेशीर ठरू शकते. लहान मुलांच्या दाढा लहानपणीच शक्यतो काढू नयेत. यामुळे नंतर येणारी दाढ ही जागा मोकळी मिळाल्याने वेडीवाकडी येते. मूल जर आठ ते नऊ वर्षांचे असेल, तर दाढ काढू शकतो. मात्र त्याआधी दाढ न काढणेच हितावह. त्याचप्रमाणे मुलांना दुधाची बॉटल न देणे, शक्यतो मूल दीड वर्षाचे झाल्यानंतर त्याला दूध बंद करणे, कारण मूल रात्री दूध पिऊन झोपले तर दात किडण्याची शक्यता असते.

दिवसातून दोन वेळा ब्रश करणे, दूध, चोको, बिस्कीट खाल्ल्यानंतर चूळ भरणे, दात, दाढदुखीनंतर तत्काळ डॉक्टरी इलाज करणे, आदी गोष्टी पालकांनी समजून घेतल्या पाहिजेत. याशिवाय मुलांना दात येताना जुलाब होणे ही बाब दात येण्याशी निगडित नाही.

ब्लूटूथ डिव्हाइसशी कनेक्ट होत नसेल तर बदला 'या' सेटिंग्स

तुमच्या फोनच्या ब्लूटूथमध्ये समस्या येत असल्यास किंवा ब्लूटूथ कोणत्याही डिव्हाइसशी कनेक्ट होत नसल्यास काळजी करण्याची गरज नाही. खाली दिलेल्या स्टेप्स फॉलो करा. ब्लूटूथ हे सर्व अँड्रॉइड फोनमधील सर्वात उपयुक्त फीचरपैकी एक आहे, जे युजर्सना दोन अँड्रॉइड फोनमध्ये फाइल्स शेअर करण्याची परवानगी देते. ब्लूटूथ फोनला कोणत्याही वायरलेस डिव्हाइसशी कनेक्ट करण्याची परवानगी देते. पण अचानक ब्लूटूथने काम करणे बंद केले तर? ही एक सामान्य समस्या आहे. जर तुमच्याही अँड्रॉइड फोनवर ब्लूटूथ काम करत नसेल तर त्याचे निराकरण कसे करावे हे जाणून घ्यायचे असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी.

असे का होते? ब्लूटूथ एक इन बिल्ट फीचर आहे. मुख्यतः समस्या फोनच्या फर्मवेअरमध्ये असते. फोनची ओएस म्हणजेच ऑपरेटिंग सिस्टीम जुनी किंवा आऊटडेटेड. फोनच्या सॉफ्टवेअरमधील त्रुटीमुळे.ब्लूटूथ कॅशे फाइल्समध्ये मालवेअर हल्ला झाला असेल तर, नेटवर्क सेटिंग्जमध्ये समस्या असल्यास किंवा उपकर जवळ ठेवले असल्यास.

काय करावे?

डिव्हाइस अनपेअर करा. जर ब्लूटूथ दोन डिव्हाइसेससह जोडलेले असेल, परंतु कनेक्ट करण्यात अक्षम असेल, तर तुम्हाला दुसरे डिव्हाइस अनपेअर करावे लागेल. काही वेळा किरकोळ त्रुटींमुळेही असे घडते. यासाठी तुम्हाला खाली दिलेल्या स्टेप्स फॉलो कराव्या लागतील. फोनच्या सेटिंगमध्ये जा.



त्यानंतर ब्लूटूथवर जा आणि कनेक्टेड डिव्हाइसेसवर जा. त्यानंतर तुम्ही जोडणी रद्द करू इच्छित असलेल्या डिव्हाइसच्या पुढील "I" चिन्हावर टॅप करा. त्यानंतर Forget this device पर्यायावर टॅप करा. काही सेकंद प्रतीक्षा करा आणि नंतर डिव्हाइस पुन्हा जोडा.

डिस्कव्हरेबल फीचर :

- वरील पद्धतीनंतरही तुम्हाला हीच समस्या येत असेल, तर तुम्हाला डिस्कवरेबल फीचर चालू करावे लागेल. हे वैशिष्ट्य बंद असताना, तुम्हाला ब्लूटूथ कनेक्शन समस्या येतात. ते चालू करण्यासाठी स्टेप्स फॉलो करा.
- प्रथम सेटिंगमध्ये जा आणि नंतर ब्लूटूथवर जा.
- ब्लूटूथवर टॉगल करा. त्यानंतर ब्लूटूथ डिस्कव्हरेबल फीचर चालू करा. डिव्हाइस पुन्हा कनेक्ट करण्याचा प्रयत्न करा.

ब्लूटूथ सेटिंग्ज रीसेट करा :

ब्लूटूथच्या नेटवर्क सेटिंगमध्ये बग असल्यास, तुम्हाला कनेक्टिव्हिटी समस्यांना सामोरे जावे लागते. या प्रकरणात त्याची सेटिंग्ज रीसेट करा. यासाठी तुम्हाला आधी सेटिंगमध्ये जावे लागेल. त्यानंतर सिस्टमवर जावे लागेल. त्यानंतर प्रगत ड्रॉप-डाऊन बटणावर टॅप करा. त्यानंतर रीसेट पर्यायांवर टॅप करा आणि वाय-फाय, मोबाइल आणि ब्लूटूथ रीसेट करा.

नाचणी खाण्याचे सहा गुणकारी फायदे

साधारणपणे प्रत्येक घरामध्ये ज्वारी, बाजरी किंवा तांदळाची भाकरी करण्यात येते. मात्र, नाचणीची भाकरी फार क्वचित वेळा केली जाते. खरं तर नाचणी अत्यंत पौष्टिक असून शरीरासाठी अत्यंत उपयोगी आहे. विशेष म्हणजे नाचणी केवळ भाकरीपूरतीच मर्यादित नसून वेगवेगळे पदार्थ करून तिचा आहारात समावेश करता येऊ शकतो. त्यामुळे चला तर आज जाणून घेऊयात नाचणी खाण्याचे फायदे...

- नाचणीमुळे वजन नियंत्रणात राहते.
- पोटदुखी, अपचन तक्रारी दूर होतात.
- अशक्तपणा दूर होतो.
- कंबर दुखत असल्यास नाचणीची पेज प्यावी.
- शरीरावर फोड आल्यास ते फोडण्याकरिता नाचणीच्या पिठाचे पोटीस बांधावे.
- शरीरातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते.

पाय सुंदर बनवण्यासाठी काही टीप्स

काही लोकांची त्वचा खूप कोमल आणि मुलायम असते. मात्र याउलट काही लोकांची त्वचा खूप प्रयत्न केल्यावरही कोरडीच असते. पायाच्या कोरड्या त्वचेवरील उपचाराबाबत काही टीप्स ...

पायाच्या कोरड्या त्वचेमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर काळजी घेणे आवश्यक आहे. कोरड्या त्वचेसाठी केवळ क्रीम पुरेसे नाही तर साफसफाईकडेही लक्ष देण्याची गरज असते. पायाची कोरडी त्वचा मुलायम करण्याआधी हे लक्षात घ्या की, तुम्ही कधीही उघड्या पायांनी राहू नका, पायांत नेहमी बूट-चप्पल इत्यादी घाला. पायांची योग्यप्रकारे साफसफाई करा.

वेळोवेळी पेडिक्योर करत राहणे पायाच्या त्वचेला नरमपणा आणते. आंघोळ करताना पायांना व्हॅसलिन, तेल इत्यादी लावावे. शिवाय बाहेर जाताना पायांवर चांगल्या क्वालिटीचे क्रीम लावावे. ज्यामुळे पाय मुलायम राहतात.

पायाचा कोरडेपणा थांबवण्यासाठी दररोज रात्री पाय चांगल्या प्रकारे धुऊन क्रीम लावून झोपावे. त्यामुळे पाय कोमल राहतील. पायांची त्वचा मुलायम होण्यासाठी आणि संक्रमण टाळण्यासाठी व्हिटॅमिन 'ई' युक्त जैतून तेल वापरावे. जैतून तेल अँटीऑक्सिडंट्सने भरपूर असते, जे त्वचेला मृदू बनवते.

व्हिटॅमिन आणि प्रोटीनयुक्त खाद्यपदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. पायांच्या त्वचेसह पायांच्या नखांचीही देखभाल खूप आवश्यक आहे. अशात तुम्ही त्वचेचा नरमपणा कायम ठेवण्यासाठी किमान पंधरा दिवस पेडिक्योर करा. पायांना जास्त गरम पाण्यांनी धुऊ नये. एवढे करूनही तुमची त्वचा कोरडीच राहिली तर तुम्ही स्किन स्पेशालिस्टकडून उपचार करावेत.

पाय सांभाळणे, त्यांच्याकडे नियमित लक्ष देणे हे महत्त्वाचे आहे. पायाची नखे कापताना ती बोटांलगोलग न कापता थोडे अंतर ठेवून कापली पाहिजेत. त्वचा कोरडी होत असेल तर त्यावर त्वचा मुलायम करणारी औषधे किंवा तेल चोपडले पाहिजे. पायाला भोवरी असेल तर ती काढून घेतली पाहिजे.

स्लिपर किंवा अर्धा अधिक पाय उघडा ठेवणाऱ्या चपला वापरण्याऐवजी बूट वापरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पायाच्या संवेदना कमी झाल्या तर नियमितपणे पाय तपासायला हवेत.

पायाची खालची बाजू आपल्याला नीट दिसत नाही म्हणून प्रसंगी पायाखाली आरसा धरून हे केले पाहिजे. कुठे जखम आढळली तर ती गोष्ट त्वरित डॉक्टरांच्या नजरेस आणून दिली पाहिजे.

तोंडाला चव नाहीये?

मग आहारात करा चिकूचा समावेश

सर्वात गोड फळ कोणतं? असा प्रश्न विचारला तर साहजिकच चिकू आणि सीताफळ ही दोन नावं समोर येतील. त्यातील चिकूमध्ये नैसर्गिक साखरेचं प्रमाण जास्त असतं त्यामुळे हे फळ अनेकांना आवडतं. भारतात गुजरात, बिहार, बंगाल, उत्तर प्रदेश तर महाराष्ट्रात पुणे, कोकण, खान्देश, सुरत, ठाणे या ठिकाणी चिकूची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे बाजारात कोणत्याही ऋतूमध्ये चिकू सहज मिळतो. चवीला जसा हा चिकू गोड असतो तसेच त्याचे काही फायदेदेखील आहेत. त्यामुळे चिकू खाण्याचे फायदे कोणते ते पाहुयात.

- चिकूमध्ये फलशर्करा असते. त्यामुळे थकवा जाणवल्यास चिकू खावा.
- अरुची, मळमळ आम्लपित्त, अतिसार या आजारांमध्ये उपयक्त आहे.
- रक्त दाब कमी असणाऱ्या व्यक्तींनी चिकू खावा.
- चिकू खाल्ल्याने आतड्यांची कार्यक्षमता वाढून व ती सुदृढ बनतात.
- वारंवार चक्कर येणं, शरीरातील साखर कमी होणं अशा तक्रारी असतील तर चिकू खावा.
- तापामुळे तोंडाची चव गेल्यास चिकू खावा.
- चिकूचं सेवन केल्यामुळे शौचास साफ होते.
- जुलाब, ताप असल्यास चिकू खावा.

सावधानता –

- मधुमेह असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्याने चिकू खावा.
- कच्चा चिकू कधीच खाऊ नये.

पोटात जंत किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास दररोज हे खा

आपण हे ऐकलेच असणार की, दररोज एक सफरचंद खा आणि डॉक्टरला पळवून लावा. म्हणजे दररोज एक सफरचंद खाल्ल्याने आपण डॉक्टरांच्या फेऱ्यांपासून म्हणजे आजारांपासून लांब राहतो. कॅल्शियम, फायबरसह अनेक पौष्टिक घटकांनी समृद्ध असलेल्या सफरचंदाचे सेवन केल्याने आपण निरोगी राहतो. यासह हे आपल्या पचनक्रियेला देखील चांगले ठेवते. पचन क्रिया चांगली असणे म्हणजे आपले शरीर बऱ्याच रोगांपासून संरक्षित राहते आणि आपण स्वतःला ताजेतवाने आणि निरोगी अनुभवाल.

- सफरचंदाचे नियमित सेवन केल्याने आपली प्रतिकारकशक्तीदेखील वाढते. चला तर मग आपण सफरचंदाच्या फायद्यांबद्दल बोलू या.
- सफरचंद खाणं आरोग्यास खूप फायदेशीर आहे. यामुळे आरोग्याच्या अनेक समस्यांवर मात करता येते. पोटात जंत झाले असल्यास तर रुग्णाला दररोज दोन सफरचंद खायला द्या किंवा त्याला दररोज एक ग्लास ताज्या सफरचंदाचा रसदेखील देऊ शकता. यामुळे पोटातील जंत मरतात आणि शौचास साफ होते.
- सफरचंदाचे सेवन केल्याने अनेक रोग दूर राहतात. ज्या लोकांना डोकेदुखी, चिडचिड, अशक्तपणा किंवा विसर पडण्याची सवय असल्यास, त्यांनी जेवण्यापूर्वी दोन ताज्या सफरचंदाचे सेवन केले पाहिजे. अशा रुग्णांनी सामान्य चहा किंवा कॉफीचे सेवन न करता फक्त सफरचंदाचा चहा प्यावा.
- ज्या लोकांचे हृदय कमकुवत आहे किंवा हृदयाचे ठोके कमी किंवा जास्त होत असल्यास, त्यांनी चांदीचे वर्क लावलेल्या सफरचंदाच्या मोरावळ्या (मुरंबा)चे सेवन केले पाहिजे.
- सफरचंदामध्ये असलेले फायबर लठ्ठपणा कमी करण्यास उपयुक्त आहे, ज्यामुळे एखादी व्यक्ती इतर आजाराला बळी पडण्यापासून वाचते. अनिद्रेच्या उपचारातही सफरचंद उपयोगी आहे.
- आपणास रात्री झोप न येत असल्यास किंवा मध्यरात्री जाग आल्यावर पुन्हा झोप लागत नसल्यास झोपण्यापूर्वी एका सफरचंदाचा मोरावळा खा आणि त्यावर कोमट दूध प्या. चांगली झोप येईल.
- बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास दररोज सकाळी उठल्यावर उपाशीपोटी दोन सफरचंद चावून चावून खा. यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास नाहीसा होतो. पचनशक्ती कमकुवत झाली असल्यास ती दूर होईल आणि भूक वाढेल. याव्यतिरिक्त सफरचंद खाण्याचे बरेच फायदे आहेत.

पीसीओएसग्रस्त स्त्रियांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण जास्त, अशी घ्या काळजी

पॉलिसिस्टिक ओव्हरिअन सिण्ड्रोम (पीसीओएस) या अवस्थेमध्ये अंडाशयांत छोटी पाण्याने भरलेली गळवे (सिस्ट) मोत्याच्या आकारात चिकटलेली असतात. याशिवाय हार्मोन्सचे असंतुलन दिसून येते. पुरुषांमध्ये आढळणाऱ्या हार्मोन्सचे प्रमाण स्त्रियांमध्ये वाढते आणि इन्सुलिनच्या चयापचयावर वाईट परिणाम होतो, मासिक पाळी अनियमित होते व रक्तस्रावही कमी होतो. गेल्या काही वर्षांत पीसीओएस असलेल्या स्त्रियांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे पीसीओएसकडे एक गंभीर समस्या म्हणून बघणे आणि योग्य वेळी या आजारावर उपचार करणे ही काळाची गरज असल्याचे नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी कन्सल्टंट डॉ. रितू हिंदुजा यांनी म्हटलं

पीसीओएसग्रस्त स्त्रियांना पुढील आयुष्यात वंध्यत्व, हायपरलीडिमिया, हृदयविकार तसेच हायपरटेन्शन हे विकार होण्याचा धोका अधिक असतो. पीसीओएसने ग्रासलेल्या स्त्रियांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण जास्त असते. कारण त्यामुळे अनियमित ओवूलेशन होते किंवा ओव्ह्युलेशन होत नाही. वैद्यकीय मदतीशिवाय गर्भधारणा होणे त्यामुळे कठीण असते.

बैठी जीवनशैली, तणाव, अनियमित व चुकीच्या आहाराच्या सवयी आणि व्यायामाचा अभाव या कारणांमुळे हा आजार होतो. यातून स्थूलत्व, ओव्ह्युलेशनवर परिणाम झाल्याने गर्भधारणेत समस्या, लवकर गर्भधारणा न होणे, गर्भपात होणे आणि गरोदरपणात मधुमेह होणे यांसारख्या समस्या निर्माण होतात. पीसीओएस असलेल्या ज्या स्त्रियांना गर्भधारणा झालेली असते अशा स्त्रियांवर गर्भारपणात खूप काळजीपूर्वक लक्ष ठेवले पाहिजे.

कारण या स्त्रियांना तीन पट जास्त गर्भपाताचा धोका असतो. गर्भारपणातील मधुमेह आणि अकाली प्रसूती हे पीसीओएसचे आणखी काही दुष्परिणाम आहेत; जे गर्भारपणात आढळू शकतात. गर्भारपणात मेटफोर्मीन घेण्याचा सल्ला डॉक्टर घेऊ शकतात, त्यामुळे गर्भपाताची शक्यता कमी होते. पीसीओएस असलेल्या गर्भवती स्त्रीला नियमित व्यायामाची गरज असते.

हलके व्यायाम केल्याने इन्सुलिनचा वापर शरीर करू लागते, त्यामुळे संप्रेरकांचे संतुलन होते आणि वजन नियंत्रित राहते. चालणे आणि हलके व्यायाम हे गर्भवती स्त्रीसाठी सर्वोत्तम व्यायाम प्रकार समजले जातात. पीसीओएस असलेल्या गर्भवती स्त्रीचा आहारसुद्धा महत्त्वाचा आहे. प्रथिने आणि तंतुमय पदार्थ जास्त प्रमाणात घेल्यास गर्भारपणात इन्सुलिनची पातळी नियंत्रित राहते.

मुंबईच्या नोव्हा आयव्हीएफच्या फर्टिलिटी कन्सल्टंट डॉ. रितू हिंदुजा सांगतात, नुकतेच एक ३२ वर्षीय जोडपे मूल होत नसल्याची तक्रार घेऊन उपचाराकरिता आले होते. तीन वर्षे प्रयत्न करूनही मूल होत नसल्याने हे जोडपे चिंताग्रस्त झाले होते. चाचणीनंतर असे लक्षात आले की, ही महिला पीसीओएससारख्या आजाराने ग्रस्त होती आणि त्यामुळेच नैसर्गिकरीत्या गर्भधारणा होत नसल्याचेही समजले.

पालिकेचा गड राखण्याचे एकनाथ शिंदेंसमोर आव्हान

■**ठाणे** : आवाज मराठीचा या मुद्द्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकमेकांना टाळी दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका जवळ आल्या असताना ठाकरे बंधूंनी एकत्र येणे, यामुळे स्थानिक राजकारणाची गणिते बदलणार असून मुंबई महापालिकेप्रमाणे ठाण्यात काय होणार? याची चर्चा रंगू लागली आहे. ठाणे महापालिकेत काय होणार यापेक्षा ठाकरे बंधूंचे मनोमिलन झाल्याने जिल्ह्याचे राजकारण कोणते वळण घेणार? याच मुद्द्याची चर्चा रंगल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

ठाणे हा शिवसेनेचा अभेद्य गड मानला जातो आणि आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ठाण्याचा गड राखण्यात एकनाथ शिंदे यांना यश मिळाले आहे. मागील एक दोन वर्षात ठाणे शहर राज्यातल्या राजकारणाचे प्रमुख केंद्रबिंदू ठरले, त्याला कारण फक्त एकनाथ शिंदे आणि त्यांच्या कामाचा झपाटा.

आता ठाकरे बंधू एकत्र आल्याने त्याचा परिणाम आगामी महापालिका निवडणुकीत होण्याची चिन्हे आहेत. ठाकरे बंधु एकत्र येण्याचा फारसा फटका ठाण्यात भाजपला बसणार नसला तरी शिंदे सेनेला त्याचा फटका बसणार असल्याची चर्चा आहे. ठाण्यात महायुतीत सुप्त संघर्ष सुरू आहे. शिंदे यांना कोंडीत पकडण्याची एक देखील संधी भाजप सोडत नाही, हे आजचे चित्र आहे.

मागील काही दिवसात भाजपने सर्वाधिक आंदोलने आणि निदर्शने करून शिंदे गटाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. आमदार संजय केळकर यांनी काहीं दिवसांपासून ठाणे महापालिकेला आपले लक्ष्य केले असून महापालिकेत सुरू असलेल्या अनागोंदी कारभाराबाबत रान उठवत आहेत. वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारामुळे शिंदे गट आणि भाजप यांच्यातील वातावरण चांगलेच तापलेले आहे.

शिवसेनेने सत्तेची चव प्रथम ठाण्यात चाखली. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे बारीक लक्ष असलेले ठाणे शहर शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला. विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या आकडेमोडवरून जिल्ह्यात भाजपची पाळेमुळे घट्ट रोवली जात असल्याचे दिसून येत आहे. भाजपला मिळालेल्या मताच्या आकडेवारीवरून भाजपचा मतदार वाढत असल्याचे दिसून येत आहे.

२०१७ मध्ये झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेचे ६७ नगरसेवक निवडून आले होते. परंतु विभागणीनंतर त्यातील हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच नगरसेवक उद्धव सेनेत एकनिष्ठ राहिले. मात्र दुसरीकडे शिंदे सेनेने फोडोफोडीचे राजकारण करीत नगरसेवकांची संख्या ७४ पर्यंत नेली आहे.

त्यामुळे महापालिकेवर पुन्हा एकतर्फी सत्ता संपादित करण्याची तयारी शिंदे सेनेने पूर्ण केली आहे. तिकडे भाजपने स्वबळाचा नारा दिला आहे. त्यामुळे महायुतीत धुसफूस वाढली आहे. ठाकरे बंधू मराठीच्या मुद्द्यावरून एकत्र आल्याने २० वर्षे ज्या क्षणाची मराठी बांधव वाट पाहत होते, त्यांना देखील आनंद झाला आहे. शिंदे यांच्या राजकीय उठावामुळे नाराज झालेले ठाण्यातील जुन्या शिवसैनिकांना राज आणि उद्धव एकत्र आल्याने नवे बळ मिळाल्याची भावना झाली आहे. निश्चितच याचा परिणाम महापालिका निवडणुकीवर देखील होणार आहे.

सहा महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत ठाणे भाजप, कोपरी, पाचपाखाडी आणि ओवळा-माजिवडा मतदारसंघात शिंदे सेनेचा वरचष्मा दिसून आला. परंतु या दोनही मतदारसंघात उद्धव सेनेच्या उमेदवारांना दुसऱ्या क्रमाकांची मते मिळाली होती. ठाणे शहर विधानसभा मतदारसंघात मनसेला तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. परंतु महायुती असल्याने शिंदे सेनेला भाजपच्या मतांचा फायदा झाल्याचे दिसून आले होते. त्यामुळेच आता देखील महापालिका निवडणुकीत शिंदे सेनेला युतीची अपेक्षा आहे.

आता मराठीच्या मुद्द्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आल्याने शिंदे सेनेच्या मतांवर याचा अधिक परिणाम होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. ठाकरे बंधूंचे मनोमिलन व्हावे, यासाठी उद्धव सेनेचे आणि मनसेचे स्थानिक पदाधिकारी उत्सुक होते.

एकनिष्ठ मतदार हीच भाजपची ताकद

- मुंबई वगळून इतर ठिकाणी युती न करण्यापर्यंत भाजपची मजल पोहचली आहे. आता ठाकरे बंधू एकत्र आल्याने शिंदे गटाला युतीवर भिस्त ठेवून भाजपशी जमवून घ्यावे लागणार आहे. त्यामुळे युती व्हावी हाच आग्रह शिंदे सेनेचा असणार, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. युती झाली नाही तर निश्चितच शिंदे सेनेला निवडणूक जड जाणार आहे. राज्यात भाजपची संघटनात्मक ताकद वाढत असून ही भाजपची जमेची बाजू आहे. विधानसभा निवडणुकीच्या यशाने भाजप कार्यकर्त्यांचा हुरूप वाढला आहे. ठाणे शहरातील भाजपचा मतदार हा एकनिष्ठ मतदार असल्याचे विधानसभा निवडणुकीत दिसून आले आहे.

मनसेबाबत ठाणेकरांना सॉफ्ट कॉर्नर

- शिवसेनेच्या स्थानिक शाखा या शिवसेनेची ताकद समजली जाते. त्या शिवसेनेच्या रक्तवाहिन्या समजल्या जातात. परंतु ठाण्यातील एकदोन वगळता सर्वच शिवसेना शाखा एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या ताब्यात आहेत. उद्धव ठाकरे गटाची मोठी अडचण म्हणजे त्यांच्याकडे रस्त्यावर येऊन लढाई लढणारा शिवसैनिक राहिलेला नाही. माजी खासदार राजन विचारे सोडले तर एकही आक्रमक चेहरा त्यांच्याकडे नाही. परंतु अविनाश जाधव यांच्या नेतृत्वाखाली मनसेने ठाण्यात आपला दरारा कायम ठेवला आहे. मनसेला विधानसभा निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नसले तरी अन्याय झाल्यानंतर ठाणेकरांसाठी आवाज उठवणारा पहिला आवाज मनसेचा असतो. ठाणे शहरातील आंदोलनाचा इतिहास मनसेने कायम ठेवला असल्याने मनसेबाबत ठाणेकरांना सॉफ्ट कॉर्नर आहे.

अनाथांचा नाथ ही प्रतिमा तारणार...

- एकनाथ शिंदे यांच्यासमोर ठाकरे बंधूंचे एकत्र येणे आणि भाजप असे तिहेरी आव्हान असले तरी एकनाथ शिंदे यांना ठाण्यात आव्हान उभे करणे सोपे असणार नाही. चोवीस तास काम करणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. ठाण्यात एकनाथ शिंदे यांना मानणारा एक मोठा वर्ग आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर ठाण्यात सुरू केलेली विकासकामे त्यासाठी मोठ्या प्रमाणात आणलेला निधी, याशिवाय ठाण्यातल्या तळागळातल्या कार्यकर्त्याकडे असलेले लक्ष. कार्यकर्ता नाराज होणार यासाठी घेतलेली काळजी. शिवसेना वैद्यकीय कक्षाच्या माध्यमातून रुग्णांना दिलासा देण्याचे प्रयत्न. सामान्य नागरिकांचे प्रश्न ठाण्यातच सोडवण्यासाठी पक्षपातळीवर निर्माण केलेली यंत्रणा ही एकनाथ शिंदे यांची ताकद आहे. मागील काहीं महिन्यात शिंदे गटात मोठ्या प्रमाणात इन्कमिंग झाले असून त्यामुळे देखील एकनाथ शिंदे यांची राजकीय ताकद वाढली आहे.

दादरच्या कबुतरखान्यावर कारवाई...
साठवून ठेवलेले धान्य, दाणे जप्त

पालिकेच्या वतीने शहरभर कबुतरांना खाद्य देणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष जनजागृती व दंडात्मक मोहीम सुरू केली आहे. फ्लेक्स व पोस्टर्सद्वारे जनजागृती, विशेषतः कबुतरांमुळे होणाऱ्या श्वसनविकार, क्लॅमिडायोसिस यांसारख्या आजारांबद्दल जागृती केली जात आहे. तसेच कबुतरांना खाद्य देणाऱ्यांना ५०० ते १ हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जात आहे. त्यासाठी सीसीटीव्हीमार्फत निरीक्षण करण्यात येणार आहे.

■**मुंबई** : शहराच्या विविध भागात असलेल्या कबुतरखान्यांमुळे नागरिकांना श्वसनाच्या आजाराला सामोरे जावे लागत आहे. त्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना खाद्य टाकण्यावर याआधीच निर्बंध घातले होते. तरीही अनेक ठिकाणी नागरिक नियम पाळताना दिसत नव्हते. त्यामुळे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी विधान परिषदेत कबुतरखाने बंद केले जाणार असल्याची घोषणा करताच पालिकेच्या जी नॉर्थ विभागाच्या वतीने दादर पश्चिम येथील कबुतरखान्यावर कारवाई केली. दादरमधील कबुतरखान्यावर पालिकेने शुक्रवारी अचानक कारवाईचा बडगा उगारला. सकाळपासूनच पालिकेचे अनेक कर्मचारी त्या ठिकाणी दाखल झाले आणि कबुतरांसाठी साठवून ठेवलेले सर्व धान्य, दाणे, पोते गाड्यांमध्ये भरून नेले. त्याचबरोबर स्थानिकांनी पालिकेच्या संरचनेवर अतिक्रमण करून बांधलेले शेड हटविले. कबुतरखान्याभोवती बांधलेल्या अनधिकृत कुंपणाचा काही भाग हटविण्यात आला. सध्या मुंबई पालिकेच्या हद्दीत ५१ कबुतरखाने आहेत. काही कबुतरखाने न्यायालयाच्या आदेशानुसार बंद करण्यात आले होते. पण, हे कबुतरखाने पुन्हा सुरू झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन कबुतरांना धान्य टाकणे थांबवावे यासाठी जनजागृती आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेला एका महिन्यात कबुतरखाने बंद करण्यासाठी विशेष अभियान राबवण्याचे आणि जनजागृती मोहीम सुरू करण्याचे निर्देश लवकरच दिले जातील, असेही सामंत यांनी सांगितले होते. कबुतरखान्यामुळे या विभागात प्रचंड वाहतूककोंडी होत होती. रस्त्यावर थांबलेली माणसे, खाद्य घेऊन येणारे लोक, कबुतरांची गर्दी हे सगळं वाहतुकीसाठी मोठा अडथळा होता. त्यामुळे ही कारवाई आधीच करायला पाहिजे होती, अशी प्रतिक्रिया या विभागात राहणाऱ्या सोहम घोले या तरुणाने दिली.

गळक्या छताखाली रुग्णांवर उपचार

■**शहापूर** : शहापूर तालुक्यातील तानसा अभयारण्यातील अघई आरोग्य वर्धिनी केंद्राची गेल्या वर्षी प्रमाणेच यंदा देखील आरोग्य केंद्राच्या इमारतील पावसाळ्यात गळती लागल्याने येथे उपचारासाठी दाखल रुग्णांची प्रचंड गैरसोय होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे मागील वर्षीदेखील रुग्णालयाच्या या इमारतीला पावसाळ्यात गळती लागली होती, यावर्षी जवळपास ४० हजार रुपयांची ताडपत्री टाकून आरोग्य प्रशासनाने गळती थांबवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र सुरुवातीच्या पावसाने ओल्या झालेल्या भिंती आणि छप्पर त्यामुळे अजूनही रुग्णालयातील गळती थांबलेली नाही. तर बुधवारी २ जुलै रोजी उपचारासाठी दाखल रुग्णांना रुग्ण प्रभाग सोडून हिरकणी कक्षाचा आधार घ्यावा लागला. येथील आरोग्य अधिकाऱ्यांनी रुग्णालयाच्या इमारतीला गळती लागत असल्याने मागील वर्षापासून आरोग्य अधिकाऱ्यांनी ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्यांना वारंवार पत्रव्यवहार करून दुरुस्तीची मागणी केलेली आहे. रुग्णालयाच्या या इमारतीला यंदादेखील गळती लागली असून, अशाच परिस्थितीत रुग्णांना येथे उपचार घ्यावे लागत आहेत. अतिशय दुर्गम भागात असलेल्या अघई प्राथमिक आरोग्य केंद्रात १०८ रुग्णवाहिका २४ तास उपलब्ध असावी अशी मागणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वारंवार केलेली आहे. मात्र जिल्हा आरोग्य विभागाने सदरची बाब गांभीर्याने घेतलेली दिसत नाही.

ठाण्यात बायोगॅस प्रकल्प उभारणार
कचरा व्यवस्थापनासाठी पालिकेचे पुढचे पाऊल

■**ठाणे** : कचरा समस्येमुळे जेरीस आलेल्या ठाणे महापालिकेने कचरा व्यवस्थापन करण्यासाठी बायोगॅस प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

ठाणे शहरातील वाढती कचरा समस्या पालिकेची डोकेदुखी ठरू लागली आहे. या समस्येवर तोडगा म्हणून बायोगॅस प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय पालिकेने घेतला असून त्या संदर्भातील महत्त्वाचा प्रस्ताव नुकत्याच झालेल्या प्रशासकीय महासभेत मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार भिवंडी आतकोली येथील १५ एकर जागेत ५०० टन प्रतिदिन क्षमतेचा हा प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या घनकचरा विभागाने दिली. पीपीपी तत्त्वावर हा प्रकल्प उभारला जाणार असून २० वर्षांसाठी तो असणार आहे.

ठाणे महापालिका हद्दीत मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. उद्योगधंदे वाढत आहेत, आयटी हब, मॉल्स आदींच्या विकासकामांमुळे महापालिका हद्दीत रोजच्या रोज सुमारे ४ लाख नागरिक बाहेरून येजा करीत आहेत. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शहरात दरडोई सुमारे ५०० ग्रॅम कचऱ्याची निर्मिती होत असून त्यानुसार महापालिका हद्दीत रोज सुमारे १२०० मेट्रिक टन कचऱ्याची निर्मिती होत आहे. त्यात साधारणपणे ५० टक्के ओल्या कचऱ्याचा समावेश आहे. सद्यस्थितीत ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करण्यासाठी विकेंद्रित पद्धतीने महापालिका हद्दीत प्रत्येकी ५ टन क्षमतेचे विविध तंत्रज्ञानावर आधारीत १६ प्रकल्प कार्यान्वित आहेत. त्याद्वारे सुमारे ८० मेट्रिक टन ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात येत आहे. तसेच गायमुख परिसरात १९४ टन क्षमतेचे विकेंद्रित पद्धतीने ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी सोलराईज्ड मॅकेनिकल कम्पोस्टिंग प्रकल्प व मोबाईल कम्पोस्टिंग व्हॅन प्रस्तावित आहेत.



२५ वर्ष ठेकेदाराकडे

पीपीपी तत्त्वावर हा प्रकल्प उभारला जाणार असून ठेकेदाराला येथील जागा १ रुपये प्रतिचौरस मीटर दराने उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रकल्प उभारणीत महापालिकेला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही. संबंधित ठेकेदाराला २५ वर्ष कालावधीसाठी हा प्रकल्प चालविण्यासाठी दिला जाणार आहे.

प्रकल्पासाठी तीन वर्षांची मुदत

बायोगॅसची विक्री करून मिळणाऱ्या उत्पन्नातून रॉयल्टी ही महापालिकेला मिळणार आहे. प्रकल्पाची उभारणी तीन वर्षांत न झाल्यास पालिका जागा ताब्यात घेणार आहे. त्यातही महापालिकेमार्फत प्रतिदिन ३०० प्रतिटन ओला कचरा उपलब्ध झाला नाही, तर ठेकेदार येथील बाजूच्या ग्रामपंचायत अथवा नगरपालिकेकडून कचरा घेऊ जाण्याची परवानगी देण्यात आली आहे.

भविष्यात वाढती लोकसंख्या विचारात घेता कचऱ्याच्या प्रमाणात ही वाढ होणार आहे. त्यानुसार या निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया गरजेचे असल्याने महापालिकेने ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस निर्मितीचा प्रकल्प उभारण्याचे निश्चित केले आहे. सध्या ठाणे महापालिकेच्या माध्यमातून शहरात निर्माण होणारा कचरा हा भिवंडी येथील आतकोली येथील ३२ हेक्टर जागेत टाकला जात आहे. त्याठिकाणी आता १५ एकर जमिनीवर तब्बल ५०० टन प्रती दिन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या संदभार्तील प्रस्ताव नुकत्याच झालेल्या प्रशासकीय महासभेत मंजुर करण्यात आला आहे.

हिरवे माथेरान... प्लास्टिकखाली दबले!

■**माथेरान** : पावसाळा सुरू झाला की, माथेरान हे थंड हवामानाचे निसर्गरम्य पर्यटनस्थळ पर्यटकांनी गजबजून जाते. ढगांच्या कुशीत चालणे, सरींना अंगावर झेलणे, हिरवळीत निसर्ग अनुभवणे हे सर्व मन मोहवणारे चित्र जितकं रम्य, तितकेच धोक्याचे असल्याची भावना माथेरानकर व्यक्त करत आहेत. पर्यटकांच्या हातातले स्वस्त, रंगीबेरंगी प्लास्टिकच्या रेनकोटमुळे माथेरानमधील निसर्ग गुदमरत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

नेरळपासून माथेरानपर्यंतच्या वाटेवर ठिकठिकाणी १० ते ५० मायक्रॉन जाडीचे थर्मोप्लास्टिक रेनकोट्स मोठ्या प्रमाणावर विकले जातात. पर्यटक ते एकदाच वापरतात आणि मग कुठेही फेकून देतात. रस्त्यावर, पायवाटांवर, जंगलात, अगदी रेल्वे ट्रॅकवर सुद्धा! हे प्लास्टिक Polyethylene व ढश्उ प्रकारातले असून शेकडो वर्षांपर्यंत विघटित होत नाही.

विशेष म्हणजे माथेरानमध्ये येणारा पर्यटक वर्ग प्रामुख्याने सुशिक्षित असतो. सुशिक्षितांकडून पर्यावरणाविषयी अधिक जागरूकतेची अपेक्षा असते.

नालासोपाऱ्यात मोठी दुर्घटना... इमारतीतील रहिवाश्यांचं काय झालं?
आधी एका बाजूला झुकली, नंतर पत्त्यासारखी कोसळली...



■**पुणे** : नालासोपाऱ्यात भीषण दुर्घटना घडली आहे. अल्कापुरी परिसरात ४ मजली इमारत पत्यासारखी कोसळली आहे. साई राज २ असे या इमारतीचे नाव असून, काल रात्री ही इमारत एका बाजूला झुकली होती आणि आज कोसळली. ही इमारत अनधिकृत असून २० ते २५ वर्षांपूर्वीची जुनी आहे अशी माहिती समोर आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार काल ही इमारत एका बाजूला झुकली होती. त्यामुळे वसई-विरार महापालिकेने काल रात्रीच तात्काळ पावले उचलत सर्व ३० कुटुंबांना सुरक्षितरीत्या बाहेर काढून सुरक्षित स्थळी हलविले होते. त्यानंतर आणि आज दुपारी चारच्या सुमारास ही इमारत पूर्णपणे कोसळली कोसळली आहे. इमारत रिकामी होती, त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. या दुर्घटनेमुळे शेजारील कुसुम अपार्टमेंटचे नुकसान झाले आहे. या भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत इमारती उभ्या राहिल्या असून, त्यातील किमान ४ ते ५ इमारती धोकादायक अवस्थेत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता या इमारतींवर प्रशासन कारवाई करणार का ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

अंबरनाथमध्ये घराची भिंत कोसळली

अंबरनाथ शहरात रिमझिम पावसामुळे एका घराची भिंत कोसळल्याची घटना घडली.त्यामुळे घरातल्या सामानाचं मोठं नुकसान झालं आहे. गांधी नगरमध्ये नाल्याच्या बाजूला हे घर होते. रिमझिम पावसामुळे मागच्या नाल्याचा प्रवाह वाढला त्यामुळे माती खचत गेली, यामुळे शनिवारी दुपारी ३.३० वाजता याठिकाणी घराची मागची भिंत अचानक कोसळली. या घटनेत एक महिला थोडक्यात बचावली आहे. नाल्याच्या बाजूला पालिकेने संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे मात्र ती अर्धवट असल्याने ही दुर्घटना घडल्याचे स्थानिक लोकांनी म्हटले आहे. त्यामुळे नुकसानाची भरपाई मिळावी अशी मागणी घराच्या मालकाने केली आहे.

धावत्या लोकलमधून महिलेची उडी... पोलीस जवानाने वाचवले प्राण

■**कर्जत** : कर्जत रेल्वे स्थानकावर शनिवारी एक धक्कादायक घटना घडली. धावत्या लोकलमधून उडी मारणाऱ्या एका महिलेचे प्राण कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार राजेंद्र बागुल यांच्या तत्पर आणि धाडसी कृतीमुळे वाचले. प्रसंगावधान राखून त्यांनी महिलेचा जीव गाडीखाली जाण्यापूर्वीच वाचवला.

सुनैना अखिलेश यादव (२५) आणि त्यांचे पती अखिलेश यादव (३४, रा. शास्त्रीनगर, खोपोली) हे दुपारी ३.१५ वाजता कर्जत-खोपोली लोकल पकडण्यासाठी कर्जत स्थानकावर आले. दोघेही गाडीत चढले असता, लोकल सुटल्यावर काही कारणास्तव पती अखिलेश यादव स्थानकावर उतरले आणि गाडी वेगाने निघाली. हे लक्षात येताच सुनैना यांनी कोणताही विचार न करता धावत्या गाडीतून उडी मारली. ही धोकादायक घटना रेल्वे स्थानकावर तैनात असलेले गोपनीय शाखेचे पोलीस हवालदार राजेंद्र बागुल यांनी पाहिली आणि क्षणाचाही विलंब न करता धाव घेत सुनैना यांना स्थानकावर सुरक्षित खेचले. त्यामुळे त्यांचा जीव वाचला.

या घटनेत संबंधित महिला किरकोळ जखमी झाली असून तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात यासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

सावधान रिल्स करताय, मग ही बातमी तुमच्यासाठी, कल्याणमध्ये एका रिलमुळे तरुण पोहोचला जेलमध्ये

■**कल्याण** : हल्ली सोशल मीडियावर रिल्स व्हिडीओ बनवण्याचे प्रमाण वाढले आहे. रिल्स बनवण्यासाठी काही जण काहीही करायला तयार असतात. मात्र हेच रिल्स बनवणं आता तुम्हाला महागात पडू शकते. सोशल मीडियावर रिल्स बनवण्याच्या नादात अनेक जण कायद्याचे उल्लंघन करताना दिसत आहेत. अशीच एक घटना कल्याणमध्ये समोर आली आहे.

कल्याणमध्ये एका तरुणाला पोलिसांचा गणवेश परिधान करून हातात गावठी कट्टा घेऊन फोटो पोस्ट करणे चांगलेच महागात पडले आहे. याप्रकरणी पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

नेमकं प्रकरण काय?

कल्याणमधील मिलिंदनगर परिसरातील गौरीपाडा या ठिकाणी सनीकुमार विजय पाल उर्फ चौहान हा १९ वर्षीय तरुण राहतो. त्याला रिल्स बनवण्याचा प्रचंड शौक आहे. तो कायमच विविध रिल्स बनवत असतो. त्यातच ३ जुलै रोजी सनीकुमारला रिल बनवण्याचे होते, त्यासाठी तो पोलिसाचा गणवेश करणार आहे, त्याच्याकडे पिस्तूल आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. यानंतर कल्याणमध्ये खडकपाडा पोलिसांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली एक सापळा रचला.

या ठिकाणी पोलिसांनी संशयास्पद हालचाल करणाऱ्या सनीकुमारला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल जप्त करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या घराची झडती घेतली असता तिथे पोलिसांचे दोन गणवेश, एक स्टार नेमप्लेट आणि इतर संबंधित साहित्य आढळून आले. आश्चर्याची बाब म्हणजे, आरोपी सनीकुमारने स्वतःच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर पोलिसाचा गणवेश परिधान केलेला आणि हातात गावठी कट्टा घेतलेला एक फोटो पोस्ट केला होता. या पोस्टनंतर पोलिसांना तपासाची नवी दिशा मिळाली. या गुन्ह्याचा पर्दाफाश झाला.

अधिक तपास सुरू

यानंतर पोलिसांनी सनीकुमारला ताब्यात घेतले असून, त्याने आतापर्यंत असे किती गुन्हे केले आहेत, ही बंदूक त्याला कुठून मिळाली आणि पोलिसांची वर्दी वापरून त्याने कोणाची फसवणूक केली आहे का, याबाबत अधिक तपास सुरू आहे. मात्र अद्याप याबद्दलची माहिती समोर आलेली नाही.

डेटिंग ॲपमुळे गमावले तब्बल ७३ लाख रुपये

■**नवी मुंबई** : वयाच्या ६२ व्या वर्षी एका वृद्धाला डेटिंग ॲपवर डेट करणं चांगलंच महागात पडलं आहे. या वृद्धाची एका महिलेने तब्बल ७३.७२ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. ही घटना न्यू पनवेलमध्ये घडली असून या महिलेविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, मार्च ते मे २०२४ या काळात या वृद्धाची एका महिलेसोबत डेटिंग ॲपवर ओळख झाली. यावेळी तिने आपले नाव 'झिया' असे सांगितले. या महिलेसोबत सुरुवातीला ॲपवर बोलणं झालं. त्यानंतर काही दिवसांतच त्यांचं व्हॉट्सॲपवर बोलणं सुरू झालं. या महिलेने सुरुवातीला मैत्री करून वृद्धाचे मन जिंकले. त्यानंतर तिने सोन्याच्या व्यापारात गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवले. तिने एक खास ॲप वापरून गुंतवणूक करण्याचाही सल्ला दिला. या आमिषाला भुलून त्यांनी तीन महिन्यांत सुमारे ७३.७२ लाख रुपयांची गुंतवणूक केली. मात्र, त्यातून कुठलाच नफा मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी झिया हिला पैसे परत मागितले. त्यानंतर ती अचानक संपर्कातून गायब झाली. पुढे तिने त्यांचे फोन उचलणे बंद केले. फसवणुकीची जाणीव होताच पीडित वृद्धाने तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी ४ जुलै रोजी खांदेश्वर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), कलम ३४ (सामान्य हेतू) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार गुन्हा नोंदवला आहे. पोलिस सध्या त्या महिलेचा शोध घेत आहेत. या महिलेविरुद्ध डिजिटल पुरावे गोळा करत असून घटनेचा तपास सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com